# माणूस

७ ऑक्टोबर १९६७

चा ळी स पै से

## हजरतबल

सा त

जू न

चो वी स

ऑ ग स्ट

# KASHMIRI PANDITS ASSOCIATION (REGD.)

" NEELAM " B-1.
SITLADEVI TEMPLE ROAD.
MAHIM, BOMBAY-16 DD.

NO. KPA/BMY/67
September 26, 1967.

The Editor,
" MANUS "
POONA.

Dear Sir,

We have gone through your publication carrying the story of Kashmir ( 1st instalment ).

You have been very kind to weigh well the sufferings of the microscopic minority community, and we take this opportunity to express our deep gratitude to you and the staff for bringing to the knowledge of our Maharashtrian brothers facts and figures.
With best wishes,

Yours sincerely,
T. N. Kaul
SECRETARY.

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : एकोणिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशाची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. सप्टेंबर, २५

'माणूस'चा २३ सप्टेंबरचा अंक वाचला. 'परमेश्वरी ते १५ ऑगस्ट' लेखमालेतील 'कणाकणाने, क्षणाक्षणाने हातातून चाललेल्या काश्मीरची हाक' हे आपल्या प्रतिनिधीने श्रीनगरहून पाठविलेले पहिले वार्तापत्र वाचले व पुढील वार्तापत्रांची चातकवत् औत्सुक्याने वाट पाहत आहे. उर्दू वृत्तपत्रे आणि मुस्लिम विचारांचे इंग्रजी साप्ताहिक रेडियन्समध्ये कुमारी परमेश्वरीचे रसूल बरोबर झालेल्या निका 'संबंधी आणि तिच्या इस्लाम धर्म स्वीकारासंबंधी विपुल माहिती येत आहे. अर्थात ही सर्व एकांगी आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. परमेश्वरी ज्या सहकारी दुकानात कामास होती तेथील माहिती व तिच्या नावे कमी पडणारी 'कॅश' व गुलाम रसूलचे या कामी धावून जाऊन तिला मदत देण्याचे 'औदार्य' आदीसंबंधी उर्दू पत्रातून चकार शब्दही आला नाही. महाराष्ट्रातील इतर वृत्तपत्रांतूनही तत्संबंधी माहिती आली नाही. 'माणूस'च्या वार्तापत्रावरून या प्रकरणाचे धागेदोरे हळूहळू उकलू लागले असून पुढच्या अंकांची उत्सुकता लागून राहिली आहे.

'व्होल्गा जेव्हा लाल होते' ही श्री. स. वि. वाळिंबे यांची विचारप्रवण लेखमाला पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली पाहिजे. महत्त्वाच्या व नावीन्यपूर्ण विषयावरील सर्वांगीण स्वरूपाची लेखमाला हे 'माणूस'चे वैशिष्ट्यच कायम झाले आहे.

देवदत्त तुंगार, नांदेड,

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

स. न.                                   सप्टेंबर, २४

दि. २३ सप्टेंबरच्या अंकात श्री. म. गो. भागवत यांनी शिवसेनेसंबंधी २ सप्टेंबरच्या अंकातील श्री. सदाशिव पेठकर यांनी लिहिलेल्या लेखा-संबंधी प्रशंसोद्गार काढले आहेत. पत्राच्या शेवटी श्री. भागवत म्हणतात, 'माझे एक राजस्थानी मित्र मला म्हणाले की तुमच्याच प्रांतात तुमच्या-सारख्या **'बुद्धिवादी'** लोकांना ऐंशी टक्के जागा **'रिझर्व'** ठेवण्याची का आवश्यकता भासावी ? तसे असेल तर स्वतःला **'मागासलेली जमात'** म्हणून जाहीर करा व मग असा खास राजा-श्रय मागा.' त्या राजस्थानी मित्राला श्री. भागवत यांनी खालील वस्तुस्थिती कथन करावी अशी प्रस्तुत लेखकाची हात जोडून विनवणी आहे.

दिनांक २२–२३ जुलै रोजी मध्य रेल्वे, तिसरा वर्ग रेल्वे कर्मचाऱ्यांतून गॅझेटेड ऑफिसरांच्या निवडणुका झाल्या. एकूण छपन्न उमेदवार मुलाखतीसाठी बोलाविले होते. त्यांत आठ मद्रासी होते. उरलेल्या अठ्ठेचाळीसांपैकी अनेक उच्च श्रेणीतील सिनियर आणि हायग्रेड होते. परंतु मध्य रेल्वे, चीफ ऑपरेटिंग सुपरिंटेंडेंट श्री. व्ही. रामनाथन् यांनी पटदिशी त्या एकजात आठ मद्राश्यांच्या टोळीचीच फक्त निवड केली व बाकी सर्वांना नापास ठरवून परत पाठविले. या परत पाठविलेल्यांत बोरीबंदर स्टेशनचे स्टेशन सुपरिंटेंडेंट श्री. कात्रे पण होते. श्री. कात्रे हे सगळ्या मध्य रेल्वेच्या तिसऱ्या वर्ग कर्मचाऱ्यांत सिनिअरमोस्ट (अनुभवाने, नोकरीच्या मुदतीने) श्रेष्ठ असून 'ऑनररी गॅझेटेड वर्ग' पण आहेत. व्ही. रामनाथन् यांनी निवडलेले सर्वश्री नागस्वामी, च्यारी, राजिया, संथानम् व सुब्रह्मण्यम् हे अगदी अननुभवी आहेत, परन्तु ते मद्रासी आहेत. कात्रे प्रभृति अनेक महाराष्ट्रीयन अनुभवी मंडळी नालायक ठरली; कारण ती मद्रासी नाहीत !

श्री. पटवर्धन M. Sc. अॅटॉमिक एनर्जीतील सर्व परीक्षा पास होऊन शेवटच्या मुलाखतीला (फायनल ओरल इंटरव्ह्यू) हजर झाले असता, समोरच्या मद्रासी ऑफीसरने पहिला प्रश्न विचारला, "तुम्ही महाराष्ट्रीयन आहात काय ?" "होय." "आपण जाऊ शकता." शेकडो प्रत्यक्ष घडलेली उदा-हरणे सदरहू लेखकाजवळ तयार आहेत.

खुद्द राजस्थानमध्ये 'रिझर्व' जागा **स्थानिक** लोकांसाठी ठेवल्याला वरीच वर्षे झाली ही गोष्ट अलाहिदाच. अर्थात आपल्या 'राजकारण कर्त्यांचा' हा स्वभाव विशेष आहे म्हणा. 'हिंदीला बंदी' म्हणणारे डी. एम्. के. चे हस्तक शिवसेना-निषेध करतात तर 'बिहार बिहारींसाठी' असे रेल्वे स्थानकावर फलक लावणारे बिहार पोलीस मंत्री श्री. तिवारी मराठी माणसांच्या त्याच प्रकारच्या मागणीचा धिःकार करतात.

**दिवाकर शेरे, बोरीवली (पूर्व)**

●

मुक्काम श्रीनगर

३

माणूस प्रतिनिधी

# ७ जून....

# २४ ऑगस्ट....

हजरतबल मशिदीतून पैगंबरांचा मानला गेलेला केस नाहीसा झाल्याच्या प्रसंगावरून काश्मिरमध्ये पाच–सहा वर्षांपूर्वी जी दंगलीची प्रचंड लाट उसळली तेव्हापासून आपली राजकीय उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी दंगली घडवून आणण्याचे एक नवेच तंत्र महत्त्वाकांक्षी राजकारणी व्यक्तींच्या हाती गवसल्या-सारखे झाले. स्वाभाविक लोकक्षोभाचा उद्रेक वेगळा, जुनाट सामाजिक वैमनस्याचा स्फोट वेगळा आणि चार–आठ तासांत काहीतरी अफवा पिकवून, खऱ्याचे खोटे करून घडवून आणण्यात येणाऱ्या दंगली वेगळ्या. परमेश्वरीच्या निमित्ताने, पंधरा ऑगस्टला रिगल चौकात आपल्या आया–बहिणींच्या शीलाचे निघालेले धिंडवडे सहन न होऊन, सात्त्विक संतापाच्या तिरीमिरीने दिवसेंदिवस उग्र होत चाललेले पंडितांचे आंदोलन वेगळे आणि ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात जातीय दंगलींनी

पेटलेले श्रीनगर वेगळे. श्रीनगरचे हे आत्ताचे पेटणे आणि हजरतबलच्या निमित्ताने तेव्हाचे पेटणे, याची जात एकच आहे–राजकीय प्रतिपक्ष बदनाम करणे, उखडून टाकणे, त्याच्या प्रतिष्ठेला धक्का देणे. या राजकीय खेळात गोरगरीब जनतेचा जीव गेला तरी पर्वा नाही. ती काय ! मुकी बिचारी कुणीही, कशीही हाकलावी ! फक्त हाकलताना तोंडी भाषा जनताजनार्दनाची, लोकशाहीची ठेवली म्हणजे पुरे आहे. तेव्हा शमसुद्दीनसाहेबांचा बळी घेण्यासाठी बक्षीजी आतुर झाले होते, आता सादिकसाहेबांना उखडून टाकण्यासाठी कुणी पीर गियासुद्दीन, कुणी मीर कासिम पुढे सरसावले. खेळ तोच, पात्रे नवीन. काश्मिरात तर या खेळाचे प्रयोग वारंवार होत असतात. निमित्त सापडण्याचाच काय तो अवकाश ! रॉकेलचे डबे, पलिते, दगड, सोडा वॉटर आणि असंतुष्ट जमाव (यालाच ‘जनता’ असेही गोंडस नाव दिले जाते) ही सर्व सामग्री नेहमी तयारच असते. छू: म्हणायचे काय ते बाकी ! अनेक महत्त्वाकांक्षी राजकीय पुढाऱ्यांपाशी असा ज्याचा त्याचा फौजफाटा जमलेला असतो, त्याची व्यवस्थित जपणूक केलेली असते आणि वेळप्रसंगी आपल्या पोशिंद्या मालकाच्या उपयोगी पडून त्याचे काम साधून देणे हे या फौजफाटचाचे कर्तव्यच ठरते. मध्यपूर्वेत अरबांचा पराभव झाला त्याचा आणि काश्मिरचा काही संबंध आहे का ? पण या कारणावरून श्रीनगरमध्ये प्रचंड दंगल उसळली होती याचा आपल्याला इकडे पत्ताच नाही. गेल्या सात जूनला जमाव जमला, मिरवणुका निघाल्या, इस्रायल–निषेधाच्या घोषणा झाल्या, ‘पाकिस्तान झिंदाबाद’ झाले, दोन ख्रिस्ती प्रार्थनामंदिरांना आगी लावण्यात आल्या, ख्रिस्ती शाळांवर दगडफेक झाली. इतके भारतविरोधी वातावरण पेटले होते, की पं. नेहरूंच्या भगिनी कृष्णा हाथीसिंग, या दिवशी तेथे होत्या–त्यांच्या मोटारीवर दगडफेक झाली, उद्योगपती टाटांच्या कुणी नातेवाईक स्त्रीलाही जमावाकडून असाच त्रास दिला गेला. आणि हे सर्व पोलिसांच्या देखत; मंत्री आणि वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या निवासासमोर जमावाचे हे सर्व थैमान चालू होते. सादिक साहेबांनाही मग जमावाला शांत करण्यासाठी इस्रायलचा जाहीर निषेध करावा लागला. वास्तविक, सादिक कोण, त्यांना या परराष्ट्रीय प्रश्नावर मतप्रदर्शन करण्याचा अधिकार काय, हे प्रश्न उपस्थित व्हायला हवे होते; पण तसे काही झाले नाही. दिल्लीने हाही धक्का खपवून घेतला. न खपवून करते काय गरीब बिचारी दिल्ली ! काश्मिरातील एखादा साधा उंदीर खाण्याचे त्राणही आता या ‘बिल्ली’त राहिलेले नाही. गेल्या वर्षी काश्मिरला आमच्या पंतप्रधानांनी भेट दिली तेव्हा स्वागतासाठी धरून पकडून माणसे उभी करावी लागली. अशी दिल्ली काय काश्मीरवर वचक बसवणार, हुकमत प्रस्थापित करणार ?

७ जूनच्या चक्क्यातून सादिकसाहेब आणि ही निःस्त्राण दिल्ली सावरते न सावरते तोच काश्मिरातून आणखी एक आरोळी उठली. आरोळी कसली धमकीच ती! 'सादिक सरकारने आपला कारभार सुधारला नाही तर काश्मिरी जनतेला (!) लवकरच आंदोलन उभारावे लागेल. हे आंदोलन 'घेराओ'पेक्षाही भयानक (serious) असेल याची सादिक सरकारने याद राखावी.' आरोळी ठोकणारी व्यक्ती कुणी दुसरी-तिसरी नव्हती. काश्मिर काँग्रेसच्या अध्यक्षांचीच ही आरोळी होती. म्हणजे ज्या काँग्रेसचे मंत्रिमंडळ काश्मिरात राज्य करीत आहे त्याच काँग्रेसचा अध्यक्ष आपल्याच पक्षाच्या मुख्यमंत्र्याला जाहीर धमकी देतो आहे— आणि इकडे कामराज आणि इंदिरा गांधी निमूटपणे ही काश्मिरी जुगलबंदी पाहत आहेत, ऐकत आहेत.

एक आठवडा लोटला या पहिल्या धमकीला. दोन ऑगस्टला धमकीचे रूपांतर अंतिमोत्तरात आले. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष मीर कासीम पुन्हा गरजले, 'एक महिन्याची मुदत सादिक सरकारला आम्ही देत आहोत. या अवधीत कारभार सुधारा नाहीतर परिणामांना सिद्ध राहा.'

पाच–सहा ऑगस्टला पंडितांचे आंदोलन एकीकडे सुरू झाले होते.

कासिमसाहेबांचे डोळे लुकलुकले.

दहा–अकरा ऑगस्टपासून पंडितांच्या सत्याग्रहाला सुरुवात झाली.

कासिमसाहेब सावध झाले.

पंधरा ऑगस्टला श्रीनगरात, रिगल चौकात पंडितांना मारझोड झाली, स्त्रियांवर अत्याचार झाले. यामागे काही मंत्र्यांचा हात होता हे उघड बोलले जाऊ लागले.

कासिमसाहेबांची चक्रे फिरू लागली.

कासिमसाहेबांना आता फार वेळ नव्हता. दोन ऑगस्टला सादिकसाहेबांना दिलेल्या अंतिमोत्तराची मुदत संपत आली होती. कदाचित् पंडितसमाज आणि सादिक सरकार यांत काही तडजोड होऊन वातावरण निवळण्याची शक्यताही निर्माण होऊ लागली होती. पुन्हा अशी तयार मट्टी मिळते न मिळते! आता मिळेल त्या संधीवर, निमित्तावर झडप घालून घाव घातला पाहिजे.

कासिमसाहेब आणि इतर विरोधक आपला फौजफाटा गोळा करू लागले. जमवाजमव सुरू झाली.

तसा खुद्द कासिमसाहेबांचाच फौजफाटा खूप मोठा आहे, असा काश्मिरात सर्वत्र समज आहे. होमगार्ड्सवर त्यांचे वर्चस्व आहे, पोलिस-खाते त्यांना सहज वश होऊ शकते, असा बोलवाला आहे. मुळात काश्मिरात पोलिस व्यवस्था खूपच गोंधळाची. सरकारी, निमसरकारी, केंद्रीय, गुप्तचरीय अशी अनेक पोलिसदले तेथे नेहमीच असंबद्ध कारभार करीत असतात. कुणावर कुणाचे वर्चस्व आहे, कोण

कुणाच्या कच्छपी आहे, हेच कळेनासे व्हावे इतकी येथे या क्षेत्रातली गंतागुंत आहे अशा गोंधळाचा राजकारणी व्यक्तींनी आपल्या स्वार्थासाठी उपयोग करून न घेतला तरच नवल! पंधरा ऑगस्टला थोडीशी चुणूक दाखवली, पण तेवढ्याने काम भागत नाही, दिल्ली हालत नाही, सादिक गडगडत नाही, असे पाहिल्यावर आणखी एखाद्या संधीची वाट पाहणे भाग होते. सुदैवाने (की दुर्दैवाने!) सादिकविरोधी गटांना फार वाट पाहावी लागली नाही. जनसंघाचे अध्यक्ष आमंत्रण द्यावे तसे श्रीनगरात उपस्थित झाले आणि ते करायला गेले एक आणि झाले भलतेच.

प्रा. मधोक आले ते अगदी वेगळ्या कारणासाठी. दहा खासदारांची एक तुकडी लडाखला भेट देण्यासाठी निघाली होती, त्यात प्रा. मधोक यांचा समावेश होता. श्रीनगरात मुक्काम पडला, तेव्हा साहजिकच आंदोलनाच्या नेत्यांशी सर्वांचीच बातचीत झाली. प्रा. मधोक यांनी त्यातल्या त्यात विशेष लक्ष घालून मुख्यमंत्री सादिक यांचीही या प्रकरणी भेट घेतली. या मध्यस्थीला थोडेफार यश लाभण्याची शक्यता दिसत होती. सादिक यांनी काही आश्वासने दिली होती, असे म्हणतात. सादिक-भेटीचा हा वृत्तांत सांगण्यासाठी म्हणून प्रा. मधोक यांनी लडाखला निघण्या-पूर्वी दि. २२ च्या संध्याकाळी पंडितांची एक सभा घेतली. या सभेत बोलता बोलता ते एवढेच म्हणाले, 'ज्यांना या देशाशी प्रामाणिक राहायचे नसेल त्यांनी पाकिस्तानात चालते व्हावे.' प्रा. मधोक यांच्या परिचयातल्या एका पत्रकाराने—जो तिथे उपस्थित होता—मला सांगितले, की यापेक्षा प्रा. मधोक काही जास्त बोलले नाहीत. आता यात चिडण्यासारखे काय आहे? अशी विधाने तर खुद्द सादिक-साहेबांनीही अनेकदा केलेली आहेत. पण विपर्यास झाला, केला गेला. वार्ता अशा फैलावल्या गेल्या, की प्रा. मधोक यांनी आपल्या भाषणात साऱ्याच मुसलमानांना काश्मिरातून चालते व्हा म्हणून सांगितले. हे कसे सहन केले जाणार!

चोवीस तारखेच्या सकाळपासूनच वातावरणाचा रंग पालटला. कुजबुजणारे घोळके रस्त्याच्या कडेकडेला दिसू लागले, दुकाने बंद ठेवण्यात आली, श्रीनगरच्या वेगवेगळ्या भागांतून लहानमोठ्या मिरवणुका 'Bloody Madhok get out' अशा घोषणा देत मुख्य रस्त्याकडे जमू लागल्या. पाच ते तेवीस ऑगस्टपर्यंत पंडित-समाज, पोलिस आणि सादिक सरकार या त्रिकोणातच आंदोलन फिरत होते—पण दिनांक चोवीसपासून त्याला वेगळीच—जातीय हिंदूविरोधी कलाटणी उघडउघड दिली गेल्याचे स्पष्ट दिसत होते. दुपारनंतर जमावाच्या हालचालींना विशेष जोर चढला. गाव कदल, गणपत यार, झाला खुद, हब्बकदल, बाना मोहल्ला, खानका मोहल्ला या हिंदू वस्त्यांवर गुंडांनी चाल करून तेथे बरीच मोडतोड, दगडफेक व शिवीगाळ चालू केली. एके ठिकाणी तर शाळा-कॉलेजांतून सुटलेल्या मुलींना गुंडांनी अडवले, त्यांचे वरचे कपडे फाडले, घड्याळे व आंगठ्या लुबाडून नेल्या. जमाव

हटवण्यासाठी वा गुंडांना पकडण्यासाठी पोलिसांनी कुठेही, काहीही हालचाल केली नाही.

जमावाचे आणखी एक उद्दिष्टही साध्य झाले. याच दिवशी धनवतीच्या अर्जाची न्यायालयात सुनावणी होणार होती व शक्यता होती, की परमेश्वरीला आपल्या आईच्या स्वाधीन केले गेले असते. १४४ कलम जारी असताना न्यायालयाच्या बाहेर आठ–दहा हजारांचा जमाव कसा जमू शकत होता, हे एक आश्चर्यच आहे. पण काश्मिरात अशी आश्चर्ये नेहमी घडत असतात. जमाव केवळ जमू शकला, त्याची पांगापांग केली गेली नाही–एवढेच नव्हे, तर त्याच्या मुक्त लीला चालू दिल्या गेल्या. घोषणा–आरडाओरड, शिवीगाळ इतकी वाढली, की न्यायालयाला आपले काम शेवटी बंद करावे लागले. परमेश्वरी गुलाम रसूलच्या हातून निसटू नये म्हणून केवढा हा आटापिटा !

आणि सादिकसाहेबांची आवाहने सुरूच होती, शांतता आणि सुव्यवस्था टिकली पाहिजे, जातीय सलोख्याची काश्मिरची श्रेष्ठ परंपरा राखली पाहिजे–वगैरे वगैरे. ज्याला आपल्या मंत्रिमंडळात सलोखा टिकवता येत नाही त्याचे हे अरण्यरुदन कोण ऐकणार !

सादिकसाहेबांचे हे अरण्यरुदन कोणी ऐकत नव्हते. एवढेच नाही, तर त्याच दिवशी त्यांच्या कळत वा न कळत सरकारी तिजोरीतील पैसा दंगली घडवून आणण्यासाठी गुंडांना, समाजकंटकांना वाटला जात होता तरी त्यांची काही मात्रा चालू शकत नव्हती, असा पुरावा आता बाहेर पडू लागला आहे. सत्ताधारी पक्षाचा अध्यक्ष, काही अधिकारारूढ मंत्री, अनेक पोलिसदलांपैकी काही दले वा त्यातील काही विभाग हे सर्व पाठीशी असताना गुंडांना आता भय कुणाचे ? चोवीसचा दिवस त्या मानाने शांततेत गेला असे म्हणावे, एवढ्या दंगली आता पंचवीसला उसळणार होत्या; त्यासाठी पुरेशा नवीन अफवा पिकवण्यात येत होत्या. चोवीसला श्रीनगरात फक्त गुंड–समाजकंटकांचे जमाव थैमान घालीत होते. पोलिस तटस्थ होते. आता पंचवीसला संयुक्त हालचाली आणि अत्याचारांचे नवे भीषण पर्व सुरू होणार होते. आतापर्यंत फक्त शरीरावर जखमा झाल्या होत्या, रक्त सांडले गेले होते, आता मृत्यूशीच गाठ पडणार होती.

पंचवीसचा दिवस हा पंधरा ऑगस्टपेक्षाही या आंदोलनातील काळाकुट्ट दिवस म्हणून ओळखला जाणार होता–

या दिवसाची सुरुवात अशी होणार होती—

[ पुढील अंकी ]

# ' भारतीय ' माणूस

काही दिवसांपूर्वी एक अमेरिकन निरीक्षक भारताच्या दौऱ्यावर आला होता. दौरा संपवून मायदेशी परतण्यापूर्वी त्याला कोणीतरी मोठ्या उत्सुकतेने विचारले, ' कसा काय आहे आमचा देश ? ' ' चांगला आहे की ! '--पाहुणा उत्तरला. परंतु एवढ्या साध्या उत्तरावर पृच्छकाचे समाधान झाले नव्हते. म्हणून त्याने आणखी एक प्रश्न विचारला, ' कसा काय वाटला सर्वसामान्य भारतीय माणूस ? ' या प्रश्नाला त्या अमेरिकन पाहुण्याने जे उत्तर दिले ते मोठे मार्मिकहोते. तो म्हणाला, ' खरं सांगू का, भारताच्या सगळ्या राज्यांत मी जाऊन आलो. मला बंगाली माणूस भेटला, गुजराती भेटला, महाराष्ट्रीय भेटला, केरळीय भेटला. पण भारतीय माणूस मात्र काही कोठे आढळला नाही ! '

भारतद्वेषी अमेरिकन गृहस्थाची खवचट प्रतिक्रिया असे म्हणून या उत्तराची विल्हेवाट लावली जाण्याची शक्यता आहे. परंतु गेल्या आठवड्यात राज्यांच्या मुख्य-मंत्र्यांची राजधानीत जी बैठक भरली होती आणि तीत जी चर्चा झाली ती वाचली, की त्या अमेरिकन निरीक्षकाने आमच्या मर्मावर अचूक बोट ठेवले आहे असे म्हणावेसे वाटते. मुख्यमंत्र्यांची बैठक म्हणजे आपल्या देशातील प्रमुख शास्त्यांची बैठक होय. साहजिकच या बैठकीत विद्यमान समस्यांचा भारतीय पातळीवरून विचार होत असेल अशी कोणाचीही रास्त अपेक्षा असते. या बैठकीला प्रारंभ करताना प्रधानमंत्री इंदिरा गांधी व अन्नमंत्री जगजीवनराम यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय पातळीवरून सर्व प्रश्नांचा विचार करण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

या बैठकीमध्ये प्रामुख्याने देशातील अन्नधान्याच्या परिस्थितीचा विचार होणार होता. गेल्या दोन वर्षातील अवर्षणामुळे आपल्या देशात अन्नधान्याची टंचाई इतकी वाढत गेली की कलकत्त्यासारख्या साठ सत्तर लाख लोकवस्तीच्या प्रमुख शहरा-मध्येही साठ पैशांच्या पावाच्या तुकड्यासाठी मैलमैल लांब रांग लागू लागली. अन्न-धान्याचा एवढा मोठा तुटवडा पडल्यानंतर शेतकऱ्यांनी आणि दलालांनी आपल्या-जवळचा धान्यसाठा काळ्या बाजारात हलविला. आणि यानंतर एक किलो गहू किंवा तांदूळ मिळविण्यासाठी सर्वसामान्य माणसाला व्यापारी सांगेल तेवढे पैसे मोजण्याची पाळी आली.

# दिसत नाही !

सुदैवाने गेल्या जूनपासून पावसाने मेहेरबानी केली असल्यामुळे खरीप पीक बरे येईल अशी आशा वाटू लागली आहे. अशा वेळी मुख्यमंत्री एकंदर धान्य—परिस्थितीचा विचार करण्यासाठी दिल्लीत जमले होते. या देशात निर्माण होणाऱ्या व आयात केल्या जाणाऱ्या अन्नधान्याचे पन्नास कोटी लोकसंख्येला (नेमका आकडा डॉ. चंद्रशेखर सांगू शकतील) तिच्या गरजेच्या प्रमाणात समान वाटप करणे हे कोणत्याही कल्याणकारी राज्याचा दावा सांगणाऱ्या शासनयंत्रणेचे प्रथम कर्तव्य ठरते. या दृष्टीने पाहिले तर सारा देश हाच एक अन्नधान्य विभाग मानावयास हवा.

परंतु गेल्या आठवडयात भरलेल्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये एकाही मुख्यमंत्र्याने हा राष्ट्रीय दृष्टिकोन डोळयांसमोर ठेवून आपले मत व्यक्त करण्याचे भान ठेवले नाही. सध्या प्रत्येक राज्य हा स्वतंत्र धान्यविभाग आहे, तशीच व्यवस्था यापुढेही कायम ठेवावी असा आग्रह सर्व मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. यावरून प्रत्येक राज्य केवळ आपल्यापुरताच विचार करण्यात कसे मशगुल आहे याचा धवधवीत पुरावा मिळतो. साऱ्या राज्यांत हिंडून आपल्याला भारतीय माणूस आढळत नाही असे जे अमेरिकन निरीक्षकाने सांगितले ते याच अर्थाने.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या भारतीय राजकारणाची हीच खरी शोकांतिका आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातले वातावरण पाहिल्यानंतर तर हा फरक विशेषच ध्यानात येतो. साठएक वर्षांपूर्वी कर्झन साहेबाने बंगालच्या फाळणीचा घाट घातल्यानंतर महाराष्ट्राला ते दुःख आपले वाटले आणि बंगालची फाळणी रद्द व्हावी यासाठी मराठी नेत्यांनी प्रखर आंदोलन उभारले आणि आज परिस्थिती अशी आहे की आसामसारखे पूर्व सीमेवरचे मोक्याचे राज्य हळूहळू भारतीय शासनाच्या कक्षेतून निसटत चालले असताना ही फक्त केंद्र सरकारची जबाबदारी आहे असे मानून इतर सर्व राज्ये या गंभीर घटनेसंबंधी उदासीन झाली आहेत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना बेळगावची काळजी लागावी किंवा कासरगोडच्या प्रश्नाने म्हैसूरचे मुख्यमंत्री व्यथित व्हावेत हे समजण्यासारखे आहे. राज्यांच्या मर्यादित परिसरात या प्रश्नांचे महत्त्व आहे हे नाकारून चालणार नाही. परंतु एखाद्या राज्याचा प्रश्न संपूर्ण भारतीय परिस्थितीच्या संदर्भात कितपत महत्त्वाचा आहे याचा संघराज्याच्या

घटनेने एकत्र आलेल्या राज्यांनी विचार करावयास नको काय हा खरा प्रश्न आहे.

हा संकुचिततेचा रोग कोणत्याही एका विशिष्ट राज्यापुरता मर्यादित आहे असेही नाही. चंदिगड हे शहर पंजाबमध्ये असावे की हरियानामध्ये असावे याचा निर्णय करून घेण्यासाठी बीरेंद्रसिंग आणि गुरुनामसिंग परस्परांविरुद्ध किती कडवी भाषा बोलत आहेत याचे वृत्तांत तेथील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत आहे.

## सारे एकाच माळेचे मणी

हे झाले राजकीय प्रश्न, त्यामुळे त्यात राजनीतीचे संकुचित डावपेच खेळले गेले तर तेही क्षम्य मानता येईल. परंतु अन्नधान्यासारख्या मानवी जीवनाशीच निगडित असलेल्या प्रश्नाबाबत तरी हा प्रादेशिकवादाचा खेळ खेळणे केवळ अराष्ट्रीय नव्हे तर अमानुषही आहे याचे भान सत्ता टिकविण्याच्या धडपडीत अहोरात्र व्यग्र असणाऱ्या राजकारणधुरंधरांना असू नये ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. केरळमधल्या सर्वसामान्य माणसाला दोन वेळची भूक भागविण्याइतका तांदूळ मिळतो आहे किंवा नाही हा प्रश्न केरळ सरकारने व जास्तीत जास्त केंद्र सरकारने हाताळावा. आंध्रच्या ब्रह्मानंद रेड्डी यांना त्याचे काहीच सोयरसुतक वाटत नाही. तीच गोष्ट मध्यप्रदेशाची. धान्यदृष्टया शिलकी असलेल्या या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना शेजारचा गुजरात किंवा महाराष्ट्र किती तीव्र धान्यटंचाईला तोंड देत आहे याचा विचार करण्याची जरुरी भासत नाही.

एखादा पोलाद कारखाना इकडे उभारावा की तिकडे उभारावा, यासाठी आंध्र आणि मद्रास ही दोन राज्ये परस्परांशी गुद्यावर येण्याची भाषा बोलतात. कृष्णा आणि गोदावरी या नद्यांच्या पाण्यावरून महाराष्ट्र, म्हैसूर आणि आंध्रप्रदेश या तीन राज्यांमध्ये किंवा नर्मदेच्या पाण्यावरून गुजरात आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये चिघळलेला वाद आमच्या संकुचित प्रादेशिकवादाचा बोलका पुरावा आहे. वस्तुत: पोलाद कारखाना कोठे उभारावा हा प्रश्न तत्संबंधित तज्ज्ञांनी सोडविला पाहिजे. जी गोष्ट पोलाद–कारखान्याची तीच पाणी वाटपाची. एखादी नदी एका विशिष्ट राज्यात उगम पावते व दुसऱ्या एका विशिष्ट राज्यामधून वाहत जाऊन समुद्रास मिळते यावरून त्या नदीच्या पाण्यावर कोणत्या राज्याचा किती अधिकार आहे याचा निर्णय करताना, कोणत्या राज्यात किती पाण्याची गरज आहे याचा विचार व्हावयास हवा. प्रत्येक प्रश्नाचे राजकारण करण्याची आमच्या राजकीय कार्यकर्त्यांना इतकी सवय लागली आहे की त्यांचे हे वर्तन पाहताना असे वाटू लागते, की जर राज्याराज्यांतील सर्व वाद, एखादा चमत्कार होऊन मिटले तर आपले राजकीय कार्यकर्ते कमालीचे अस्वस्थ होतील.

राजकारणाचा धंदा करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या दृष्टीने त्यांचे हे वर्तन ठीक असले तरी सर्वसामान्य जनतेने या कार्यकर्त्यांपासून चार हात दूर

राहण्याची वेळ आता खचित आली आहे. शिवसेनेच्या प्रश्नावरून साऱ्या भारतात व विशेषतः दक्षिण भारतात उठलेले टीकेचे मोहोळ हीच गोष्ट सिद्ध करते. उघड उघड तामीळ प्रादेशिक वादावर उभ्या असलेल्या द्रविड मुन्नेत्र कळघमला शिव-सेनेच्या नावाने बोटे मोडण्याचा कोणता अधिकार आहे ? बरे, या आरडाओरडीत केवळ कळघमसारखी सर्वस्वी संकुचित वृत्तीची (याच कळघमने एकदा भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले होते. हा इतिहास काही जुना नाही.) संघटनाच पुढाकार घेते असेही नाही. राममूर्ती, गोपालन यांच्यासारखे डावे कम्युनिस्टही शिव-सेनेच्या विरोधात पुढाकार घेऊन विशाल राष्ट्रहिताची भाषा बोलू लागतात, तेव्हा प्रत्येक राज्य हे स्वतंत्र राष्ट्रक आहे असे मानणाऱ्या या कम्युनिस्टांच्या वर्तनात तार्किक संगती शोधणे अशक्य होऊन जाते. शिवसेना जो काही प्रचार करते तो योग्य आहे की अयोग्य आहे, हा प्रश्न या संदर्भात सर्वथैव गैरलागू आहे. दाक्षिणात्यांचा सध्याचा एकंदर आवेश पाहिला की साऱ्या भारताची यांनाच तेवढी काळजी लागलेली आहे असा एखाद्याचा गैरसमज व्हावा. शिवसेनेवर टीकेचा प्रहार करण्यासाठी पुढे सरसावणाऱ्या नंबुद्रिपाद, गोपालन प्रभृती प्रच्छन्न आंतरराष्ट्रीय-वाद्यांना कासरगोडसारखा एक लहानसा तालुका केरळमधून काढून तो म्हैसूरला जोडावा असे महाजन मंडळाने सुचविताच, आम्हांला हे मंडळच मान्य नाही, हा थयथयाट करण्याचे त्याना काय कारण आहे ?

पण आपल्या येथला सध्याचा जमाना असा आहे की, राजकीय कार्यकर्त्यांच्या उच्चारात आणि आचारात संगती शोधण्याचा कोणीही प्रयत्न करू नये. काँग्रेस-वाल्यांचा हा वारसा सत्तेचे वारे लागताच इतर सर्व राजकीय पक्षही मोठ्या अह-महमिकेने चालवीत आहेत. काँग्रेसवर भ्रष्टाचाराचा आणि वशिलेबाजीचा आरोप करणाऱ्या कम्युनिस्टांच्या बालेकिल्ल्यामध्ये–केरळमध्ये–आता वशिलेबाजीने आणि भ्रष्टाचाराने केवढे थैमान मांडले आहे, याचा गौप्यस्फोट त्यांच्या एका सहकारी मंत्र्यानेच केला आहे. जी गोष्ट भ्रष्ट सार्वजनिक जीवनाची तीच संकुचित वृत्तीची. चंदीगडच्या प्रश्नावरून केवळ बीरेंद्रसिंग आणि गुरुनामसिंग यांच्यांतच मतभेद आहेत असे नव्हे तर या दोन्ही राज्यांतल्या कम्युनिस्टांपासून स्वतंत्रांपर्यंतचे सारे पक्ष चंदी-गडबावत एकमुराने बोलू शकत नाहीत. भाषिक दृष्टीने विचार करता बेळगाव महा-राष्ट्राचे आहे, असा पुकारा करणाऱ्या डांग्यांचे घटप्रभेच्या पलीकडील पक्षबांधव त्यांच्या या मताशी सहमत आहेत काय ? अशी जर जागोजाग वस्तुस्थिती आहे तर मग भारतात भारतीय माणूस दिसत नाही अशी जर एखाद्या परदेशी व्यक्तीने टीका केली तर त्याच्यावर चिडण्याचा आपल्याला काय अधिकार आहे बरे ! पर-तंत्र भारताने ' भारतीय ' माणसाची मूर्ती निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. स्वतंत्र भारतात ती मूर्ती भंग पावणार असेल तर ते साऱ्या देशाचेच दुर्दैव ठरेल !

**– सदाशिव पेठकर**

# मु क्ता फ ळे

## □ लंडनची ललकार

ठरलं बरं का मंडळी, अखेर ठरलं ! चीनने आपला जो प्रदेश १९६२ सालापासून बळकावला आहे तो परत हिसकावून घेण्याचे आता नक्की ठरले. लंडनची हवाच काही निराळी असली पाहिजे. मोरारजींनी लंडनमध्ये पाऊल टाकताच पत्रकारांशी बातचीत करताना भारतात जे आपल्याला त्यांनी कधीही सांगितले नाही ते तिथे सांगून टाकले. ते म्हणाले,–

"चीनने आमचा हजारो मैल मुलुख घशात घातला आहे. भारताने आता सबळ होऊन जमल्यास वाटाघाटींनी हा प्रदेश परत मिळविण्याचे ठरवले आहे. पण जर हे शक्य झाले नाही तरी हा मुलूख आम्ही **चीनकडून हिसकणारच !**" (जाड ठसा आमचा)

लंडन कॅन टेक इट ! लंडनवर दहा-दहा हजार विमानांनी दुसऱ्या महायुद्धात बॉम्बवर्षाव केलेला लंडनने सहन केला आहे. एखादा फटाका जोरात वाजला म्हणून ते शहर काही दचकणार नाही ! मोरारजी हे अपेय पान कधीही करीत नाहीत, त्यामुळे मोरारजींनी ही घोषणा अत्यंत सुअवस्थेत तिथे केलेली आहे यात शंका नाही. ८ सप्टेंबर १९६७ रोजी लंडनमध्ये मोरारजी हे असे म्हणाले आणि आमच्या पोटात मात्र गोळा आला ! कारण सबळ झाल्यानंतर आपण काय करणार हे सांगून टाकल्यावर, चीन आपल्याला तोपर्यंत उसंत देईल काय ? अशी शका मनात झाली. परंतु मोरारजी हे भारताचे संरक्षणमंत्री नाहीत किंवा परराष्ट्रमंत्रीपण नाहीत, तेव्हा चीन एवढे मनावर घेणार नाही असे वाटत होते. पण कसले काय ? त्या दुष्ट माओने चिडून ११ सप्टेंबरला गंगटोकपासून २० मैलांवर असलेल्या नाथु-ला खिडीत पहाटे ५ वाजता गोळाबारी सुरू केलीच. या ठिकाणी भारतीय सेनेला भौगोलिक रचना अतिशय साहाय्यभूत असल्याने निदान नाथु-ला इथे चिनी गडबड करतील अशी मुळीच अपेक्षा नव्हती.

नाथु-ला ही खिड १५० फूट रुंद असून ५० फूट अंतरावर चिनी व भारतीय फौजा तिथे आहेत. शिबंदी असलेल्या या ठाण्यापर्यंत चिनी व भारतीय फौजांनी आपआपले रस्ते तयार केलेले आहेत. दोन्ही सैन्यांमध्ये असलेल्या काटेरी तारांच्या पलीकडे केवळ ३० फुटांवरून पेकिंग–गंगटोक रस्ता फुटतो.

ज्या दिवशी मोरारजींनी ही हिंसक घोषणा केली त्याच्या आदल्याच दिवशी ६० भारतीय सैनिक काटेरी तारांचे नवे कुंपण या ठिकाणी घालीत असताना, दोन चिनी सैनिकांनी त्यांना हटकले. तेव्हा भारतीय जवानांनी संगिनी चालवल्या, अशी पेकिंग रेडिओने वार्ता प्रसृत केली होती.

भारत–पाक युद्धाच्या वेळी दोन वर्षांपूर्वी याच ठिकाणी भारताने कुंपण घातले आहे ते काढून टाका, नाही तर युद्ध सुरू होईल, अशी धमकी माओने दिली होती. नंतर पेकिंग रेडिओनेच असे जाहीर केले की, भारताने कुंपण काढून टाकले ! खोटारडे कुठले. कुंपण होते तसेच होते हे आता जगाला कळलेच की !

माओची अशी अपेक्षा असावी की, गंगटोकजवळ ठोकाठोक केली की लगेच मोरारजी घाबरतील. परंतु "गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास" असे मोरारजी नाहीत. भारत सोडल्यापासून टोकियो, लंडन, ओटावा या सर्व ठिकाणी मोरारजी जे जे बोलले त्यावरून चीनच्या हे लक्षात यायला हवे की– भारत आज ना उद्या चीनला लोळवणार आहे हे मित्रमंडळींना सांगण्याकरताच ते जणू दौऱ्यावर गेलेले आहेत आता ही गोष्ट खरी की, 'गर्जेल तो नेहमीच पडत नाही' व इतिहासात अशा तऱ्हेने आगामी शौर्याचा गावभर प्रचार कुणी केलेला नाही. परंतु, 'शूरा मी वंदिले' हे जर खरे असेल तर 'आगामी शूरा' पण जग वंदन केल्याशिवाय राहील काय ?

मोरारजी मुळीच डगमगलेले नाहीत. मोरारजी १३ सप्टेंबरला कॅनडात पोचले. त्यांनी तिथे जाहीर केले की, "काश्मीरात भारत आक्रमण करणार नाही!" कॅनडाचे पंतप्रधान लेस्टर पिअर्सन यांनी विचारले असले पाहिजे की– "पाकिस्तानने दाबलेल्या प्रदेशाचे काय ?" मोरारजींनी आपल्या कडक पांढऱ्या टोपीखाली हसत सांगितले असले पाहिजे– "फार काळ गोष्ट दाबून ठेवली की, एक घडी बसते. ती मोडून उस्कटाउस्कट करणे ही हिंसा होय !" ही खादीची घडी पिअर्सन साहेबाला कशी कळणार ! मोरारजींनी यामुळे यशवंतरावांची मात्र पंचाईत केली आहे. कै. बलवंतराय मेहता व सौ. मेहता यांच्या मृत्यूचा सूड घेण्याची घोषणा माजी संरक्षण मंत्र्यांनी करून ठेवलेली आहे. त्यांची दुसरी पुण्यतिथी झाली. पाकिस्तानला न दुखवता हा सूड कसा व केव्हा घ्यायचा मग ? जाऊ दे. मोरारजींना यशवंतरावांच्या घोषणेची कल्पना नसावी !

कॅनेडियन ब्रॉडकास्टिग कंपनीच्या मुलाखत्याने विचारले– "काश्मिरातील भारतीय सेनेचे अस्तित्व व भारतीय भूमीवरील चीनचे अस्तित्व यांत काही साम्य आहे काय ?" लोक किती खवचट असतात पाहा ! हा काय प्रश्न आहे ? मोरारजींनी सांगितले– "यात कसलेही साम्य नाही. चीनने घशात घातलेला मुलूख परत मिळविण्यासाठी भारताने सबळ होण्याचे ठरवले आहे !"

की तोडिला तरू फुटे आणखी भराने ! भारतात ६४% (मणिपूर गले तर

६४.५%) जनतेचा विश्वास गमावलेल्या काँग्रेस केंद्रीय मंत्र्यांनी, जे काही थोडे दिवस राहिले आहेत त्या अल्प काळात इंग्रजीचे व चीनचे भारतातून उच्चाटन हा जंगी कार्यक्रम आखला आहे ! वीस–बावीस वर्षे दिवा बारीक करून झोपलेला माणूस, दिवा विझवताना मोठा झाल्यावर खडबडून जागा झालेला आहे. तो लवकरच ' व्यायाम ' देखील करणार आहे !

एकंदर लक्षणे पाहता, श्रीमती इंदिरा गांधी (जगातल्या दुसऱ्या स्त्री पंतप्रधान) यांनी सिलोनमध्ये जाऊन श्रीमती सिरीमाओ बंदरनायके (जगातल्या पहिल्या स्त्री पंतप्रधान–आता माजी) यांची आठवणपूर्वक भेट घेतली. पंतप्रधानपद गेल्यावर या बाई दिवस कसे घालवीत आहेत हे आपले पाहून आलेले बरे, नाही का ?

## □ चक्रमवर्ती

म्हातारा नवरा गंमतीला असतो असे म्हणतात. म्हातारा हा केवळ नवऱ्याच्या भूमिकेतच गंमतीदार असतो असे आम्हांला वाटत नाही. राजकारणातही म्हातारे फारच गंमती करत असतात. त्यांना आपण पूर्वी काय बोललो हे आठवत नसल्याने त्यांनी काही सांगितले की लोक जेव्हा हसू लागतात, तेव्हा लोक मूर्ख आहेत असे त्यांना वाटते, म्हणून ते म्हातारे हसतात आणि म्हातारा गंमतीदार आहे म्हणून लोक हसतात. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी १९४७ साली कलकत्ता विश्वविद्यालयाच्या दीक्षांत समारंभात भाषण करताना असे सांगितले होते, की विद्यार्थ्यांना सर्व शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले पाहिजे. वीस वर्षांपूर्वी चक्रवर्तीचे हे भाषण ऐकून त्या वेळी तिथे हजर असलेल्या त्रिगुण सेन यांना स्फूर्ती मिळाली. आता वीस वर्षांनंतर त्रिगुण सेन डॉक्टरेट मिळवल्यावर भारताचे शिक्षणमंत्री झाले व या काळात चक्रवर्ती आणखी म्हातारे झाले.

विश्वविद्यालयीन शिक्षणदेखील मातृभाषेतून द्यावे असे धोरण, आता प्रत्यक्षात डॉ. सेन यांनी आखताच, चक्रवर्ती राजगोपालाचारी आता इंग्लिश भाषेचा आग्रह धरीत असलेले पाहून डॉ. सेन यांनी उघड टीका करताना चक्रवर्ती हे आता ' चक्रमवर्ती ' झाले की काय असा संशय प्रकट केला ! डॉ. सेन यांनी १९४७ सालच्या त्यांच्या भाषणाचा आधार हसत काढून दिला. राजगोपालाचारी यांनी आता जाहीर केले आहे–

" समजा, मी आता जो उपदेश करीत आहे तो वीस वर्षांपूर्वी मी जे बोललो त्याच्याशी विसंगत असला, तरी डॉ. सेन यांची अशी अपेक्षा आहे काय, की वाढत्या वयाबरोबर माझी जाण वाढूच नये ? " (Swaraj)

राजगोपालाचारी यांनी तमाम राजकारणी म्हाताऱ्यांच्या वतीने हसत हसत दिलेले हे गंमतीदार चाणाक्ष उत्तर आहे. वयाबरोबर वाढते जाण काहींची ! वीस–पंचवीस वर्षांपूर्वी " ब्रॅन्डीची बाटली " चित्रपट काढून लोकांना " हा गोरस गोड प्या हो !" म्हणून प्रचार करणाऱ्या आचार्य अत्र्यांना, ना. नाईकांनी केवळ ३॥

टक्के मद्यार्क लोकांना उपलब्ध करावा याचा फार राग आला आहे. याचा अर्थ पूर्वी गोरसात ३।। टक्क्यांहून अधिक मद्यार्क होता असा नाही, तर आचार्यांची जाण वाढली आहे. वयाबरोबर जाण वाढली.

राजगोपालाचारी यांच्या उत्तराने आता सर्वांची उत्तम सोय झाली आहे. तूर्त काहीही बोलावे, कालांतराने ‘ जाण ’ वाढली की बघता येईल ! राजगोपालाचारी यांची ‘ जाण ’ किती वाढली आहे या बाबतीत आणखी एक उदाहरण तसे गंमतीदारच आहे. हिंदी ही मोंगलांची भाषा आहे हे सांगताना ते लिहितात–

“ उत्तर भारताची व्यवहार भाषा हिंदी, ही मोंगलांच्या बुद्धीचा आविष्कार आहे. पर्शियन व अरेबिक यांच्या संकरातून व उत्तर भारतातील मोंगलांच्या राज्यातील बोली भाषांतून ही भाषा जन्म पावली. उर्दू भाषेत संस्कृत घुसडून निर्माण झाली ती हिंदी ! दक्षिणेत मोंगलाई कधीही नव्हती व दक्षिण भारताला तिथे रुजलेली इंग्रजी भाषा सोडून देण्याचे काहीही कारण नाही ! ”– (‘ स्वराज्य ’ ९ सप्टें. १९६७)



जिजामाता बाईंनी शिवाजी राजांना जन्म देऊन भारताचे किती नुकसान केले आहे ते आता हिंदीचा हट्टाग्रह धरणाऱ्यांच्या लक्षात येईल ! शिवाजीराजे आग्र्याहून सुटले, त्याची त्रिशतसंवत्सरी कसली साजरी करता ! मोंगल थेट कन्याकुमारीपर्यंत गेले असते तर आज भाषेचा प्रश्नच निर्माण झाला नसता ! राजगोपालाचारींच्या खापरपणजोबांचीच सुंता झाली असती !! पानिपतावर मरायला सदाशिवराव भाऊ गेला नसता, दत्ताजी शिंद्याचे वारस " बचेंगे तो और भी लढेंगे !" असे म्हणालेच नसते, तर आसेतुहिमाचल मोंगलाई होऊन ' हिंदी याने हिंदोस्तानी ' आज अखंड पाकिस्तानची भाषा झाली नसती का ! राजगोपालाचारींनी प्रथम पाकिस्तानला मान्यता दिली. तीदेखील हिंदी भाषिकांची संख्या कमी करण्याकरिताच ! पाकिस्तान निर्मितीत मेले ते उत्तरेकडचे मोंगलाईतले हदी भारतीय–दक्षिणेत लुंग्याची सुरकुतीदेखील हलली नाही.

परंतु यापुढे जो म्हातारा या सदरात मोडतो त्याने काहीही लिहिले वा सांगितले, तरी अनुभवाचे बोल म्हणून त्याकडे फार गंभीरपणे कुणी पाहू नये. कारण, अनुभवाच्या सोन्याच्या खाणीतून नवी नवी 'जाण' वार्धक्याबरोबर सतत येत जाणार !

तात्पर्य—राजकारणातील चक्रवर्तीपासून चक्रमवर्तीपर्यंत, सर्व राजकारणी श्रेष्ठ व कनिष्ठ माणसे काय काय सांगत आली आहेत, वा सांगत आहेत, ते आपण ऐकत वा वाचीत बसलो तर डोके फिरायची पाळी येते ! म्हणून ग्यानबाने एक–दोन सोपे नियम केले आहेत—

**म्हणोनि साने थोर न म्हणावे ।**
**संत महंत भाव सांडावे ।**
**एक मी–चि ऐसे मानावे । ज्ञानेश्वर ।।**
**दृष्टी ठेवावी मिधी ।**
**बोलणे सदा संदिग्धी ।**
**कोणा पक्षाची चिंधी । नेसो नये ।।**

**–ग्यानबा**



## □ अर्धांगी

राजकारणी पुरुषांच्या बायका नेहमी महत्त्व पावतात. त्या उद्घाटन करतात आणि समारंभातून बक्षिसे वाटतात. प्रत्येकाला बक्षिसे देताना त्या छान हसतात. काही जाहिरात झालेल्या पुरुषांचा बाबतीत ते एकटे समारंभाला गेले आहेत, अशी कल्पनाच करवत नाही. सौ. चेरियन या महाराष्ट्राच्या गव्हर्नर आहेत, अशी अनेकांची समजूत आहे ती यामुळेच! कारण, गव्हर्नर साहेब समारंभाला असले की, हा तारा उगवतोच ! असते हौस एकेकाची !

चार्लस द गॉल यांची पत्नी ययोने द गॉल ही सहसा त्यांच्या बरोबरीने आपल्या छब्या छापून आणीत नाही. ही बाई अगदीच कशी अशी तशी, म्हणून तिला एका पत्रकाराने विचारले–

"बाई तुम्ही नेहमी मागे का राहता?"

सौ. ययोने द गॉल हिने सांगितले–

"माझा नवरा फ्रेंच जनतेने निवडला असला तरी मला फक्त एकाच माणसाने निवडलेले आहे!"

मागे मागे राहणारी ही बाई, एखादी सुंदर फुसकुली सोडण्यात अपेक्षेपेक्षा पटाईत आहे. युद्धानंतर फ्रान्समध्ये गोंधळ माजला होता व द गॉल कसा तरी राज्यशकट चालवीत होता. तेव्हाची तिची फुसकुली बहारदार आहे. फ्रान्समध्ये चीज (लोणी) फार खपते. चीजचे निरनिराळे २४६ प्रकार आहेत. सौ. द गॉल हिने एकदा सांगून टाकले,

"ज्या देशात २४६ प्रकारचे लोणीदेखील असू शकते तिथे राज्य करणे कुणाला शक्य आहे का?"

तात्पर्य, सगळच तारे केवळ व्यासपीठावर नसतात !

–ग्यानबा

## चीनच्या 'सांस्कृतिक क्रांती'ची आर्थिक पार्श्वभूमी

लंडन विश्वविद्यालयाचे एक प्राध्यापक डॉ. ऑड्री डॉनियॉर्न यांनी गेल्या आठवड्यात "साम्यवादी चीनच्या 'सांस्कृतिक क्रांती'ची आर्थिक पार्श्वभूमी" या विषयावर नव्या दिल्लीत इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्सच्या विद्यमाने भाषण केले, तेव्हा या तथाकथित सांस्कृतिक क्रांतीचा एक नवीन पैलू उजेडात आला. चिनी अर्थकारणाचा व सांप्रतच्या सांस्कृतिक क्रांतीचा महत्त्वाचा संबंध आहे, हे चीनच्या आर्थिक इतिहासाकडे पाहिले म्हणजे लक्षात येते. लाल चीनची पहिली राष्ट्रीय विकास-योजना चालू असताना साम्यवादी राज्यकर्त्यांनी राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरण करण्याचे प्रयत्न चालू ठेवले. चीनमध्ये १९४९ साली साम्यवादी सरकार स्थापन झाले त्या वेळी या देशात फक्त ३,००० सरकारी किंवा निमसरकारी उद्योगधंदे होते, पण १९५७ साली, म्हणजे पहिल्या योजनेच्या शेवटच्या वर्षी ही संख्या ६०,००० झाली होती. त्यानंतर हळूहळू विकेंद्रीकरणाचा प्रयत्न सुरू झाला, परंतु इतर बऱ्याच क्षेत्रांप्रमाणे या क्षेत्रातही निश्चित धोरण असे दिसत नाही.

चीनमध्ये बँक ऑफ चायनाच्या शाखा संख्येने पोस्ट ऑफिसपेक्षादेखील जास्त असून पैसे गुंतविण्याची सोय म्हणून बँकेचा चिनी सैन्यावर फार प्रभाव आहे. ही बँक व लाल सेना हे दोन साम्यवादी चीनचे आधारस्तंभच म्हणता येतील.

चीनमधील सध्याची राजकीय परिस्थिती कशी आहे? विकेंद्रीकरण झाले असले तरी चीनचे तुकडे होऊन निरनिराळी स्वतंत्र राज्ये स्थापन होण्याची शक्यता फारच कमी दिसते. राजकीय फुटीरपणा खूपच वाढला असला तरी राजकीय एकात्मतेचा अंत:प्रवाहही निश्चितपणे वाहत आहे. मात्र बाहेरच्या जगाला वाटते त्याप्रमाणे चीन एकसंध नाही. उलट आपण एकसंध आहोत असे जगाला भासविण्याचा चीनने मुद्दाम प्रयत्न केला व जग त्या भासाला बळी पडले.

## मुक्त व्यवसायाचे माहात्म्य

गेल्या चार-पाच वर्षांत भारताने केलेल्या आर्थिक प्रगतीची पाहणी करण्यासाठी डॉ. हाइन्ज पेन्झसिन हे पश्चिम जर्मन तज्ज्ञ भारत सरकारचे पाहुणे म्हणून इकडे आले आहेत. त्यांनी संमिश्र अर्थव्यवस्थेच्या उपयुक्तेबद्दल शंका निर्माण केली आहे.

त्यांच्या मते संमिश्र अर्थव्यवस्थेत सरकार-नियंत्रित क्षेत्रावर विशेष भर असतो, त्यामुळे प्रगतीचा वेग मंदावतो. प्रगती करू पाहणाऱ्या बऱ्याच देशांत असे घडत आहे. मुक्त पद्धतीच्या अर्थकारणाला अधिक वाव मिळाला तर सामाजिक विकासाच्या क्षेत्रातही अधिक चांगला परिणाम दिसून येईल. पश्चिम जर्मनीचा असा अनुभव आहे. मात्र हिंदुस्थानात हा मार्ग अवलंबिणे सोपे नाही; कारण इकडे श्रीमंत व गरीब यांच्यांत फारच तफावत आहे. तरीदेखील भारतात खूपच सुधारणा घडून आली आहे. अनेक क्षेत्रांत अपेक्षेच्या बाहेर प्रगती झाली आहे. विशेषतः, औद्योगिक क्षेत्रातली प्रगती उल्लेखनीय आहे.

परदेशी मदतीबद्दल मत काय ? उत्तर : सर्वसाधारण जर्मन जनतेचे मत परदेशी मदतीच्या विरुद्ध आहे; कारण अशा मदतीचा जेवढा फायदा व्हायला हवा तेवढा झालेला नाही. हिंदुस्थानला होणाऱ्या परदेशी मदतीत दीर्घ मुदतीच्या योजनांवर वाजवीपेक्षा फारच अधिक पैसा गुंतविण्यात आला आहे. जर्मन भांडवलदार हिंदुस्थानात उद्योगव्यवसाय उभारतील काय ? उत्तर : येथले कर-विषयक कायदे, येथल्या कामगारांत असंतोष आणि व्यावसायिक स्पर्धेचा अभाव या गोष्टी जर्मन भांडवलदारांना फार जाचक वाटतात व म्हणून ते या देशात पैसा गुंतविण्यास कचरत आहेत.

## भारतात नैराश्य का ?

युनेस्कोचे एक उच्चपदस्थ अधिकारी जॉन फॉबेस हे तीन-चार वर्षांच्या कालावधीनंतर नुकतेच पुन: भारत-भेट देऊन गेले तेव्हा भौतिक प्रगती व मानसिक अशांती असा विरोध दिसला. या काळात भारतात " खूपच सुधारणा झाली आहे व प्रत्येक क्षेत्रात प्रगती झाली आहे. पण येथल्या वातावरणात विश्वासाचा अभाव व काही ठिकाणी तर अश्रद्धा दिसून येते. " ही चिंताजनक गोष्ट आहे. मुंबईसारख्या शहरात एक विचित्र नैराश्य पसरलेलेही दिसते. " या नैराश्याला आणि विश्वासाच्या अभावाला मूलभूत कारण खरोखरीच काही नाही. श्रम आणि साधन यांची प्रमाणावर गुंतवणूक झाली आहे व मूलभूत प्रगतीही प्रचंड झाली आहे. " तेव्हा या नैराश्यपूर्ण वातावरणाची कारणे इतरत्र शोधली पाहिजेत. यातले एक प्रमुख कारण असे असू शकेल की गल्या चार वर्षांचा काळ हा परिवर्तनाचा काळ होता आणि या काळात राजकारण, नोकरी, उद्योग-व्यवसाय इत्यादी सर्व क्षेत्रांतील नेत्याची वयोमर्यादा बदलली आहे. "






## विजय तेंडुलकर

आचार्य अत्रे यांच्या 'तो मी नव्हेच' या नाटकाने गाजलेल्या खटल्यांवरील कल्पित नाटकांचा जमाना मराठी रंगभूमीवर सुरू झाला.

त्यांच्याच 'डॉ. लागू' या ताज्या नाटकाने या जमान्याला एक नवे वैशिष्टच दिले आहे. या नाटकात कल्पितावर भार नाही. मूळ खटल्यातील बहुसंख्य अव्वल पात्रे मूळ नाव–गावांसकट येथ जशीच्या तशी उभी केली आहेत. खटल्यातील पुराव्यातूनच संविधानकाचा धागा शोधून त्यात संवाद आणि घटनारूपाने सारा खटला मोठ्या चातुर्याने ओवण्यात आला आहे.

या प्रकारे नाटक लिहिण्यात काही धोके संभवत होते. एक : नाटक खटल्याइतके विस्कळीत, तुटक आणि रुक्ष होईल. दोन : खटल्यातील न्यायदानाच्या मर्यादेत नाटकाचा विकास गुदमरेल आणि केवळ संविधानक उरेल. तीन : शाश्वत सत्यापर्यंत न पोचता न्यायालयीन सत्याकडे नाटक पोचेल आणि परिणामी ते तेवढे तकलादू होईल.

'डॉ. लागू'ही या दृष्टीने एक कसोटी होती.

मुळात ही कसोटी पत्करावी का, या प्रश्नाचे उत्तर या नाटकापुरते स्वच्छ होते. या विशिष्ट खटल्याला हा झाला तेव्हा तर फार खळबळजनक स्वरूप आले होतेच. पण त्यानंतरही या खटल्यात अंतर्भूत अशा माणसांविषयीचे आणि घटनांविषयीचे आकर्षण लोकमानसात कायम टिकून होते. सरळ सरळ मूळ नावांनी अव्वल स्वरूपात ती माणसे आणि त्या घटनाच रंगभूमीवर आणल्या तर भरपूर गर्दी खेचतील हे गर्दीचे मानसशास्त्र प्रदीर्घ अनुभवाने जाणणाऱ्या आचार्य अत्र्यांना कोणी जाऊन सांगण्याची गरज नव्हती. या एका हिशेबानेच त्यांनी मूळ खटल्याच्या मर्यादा आणि त्याच्या नाट्यीकरणातील अडचणी पत्करल्या आणि पत्रव्यवसाय आणि नाट्यव्यवसाय या दोहो क्षेत्रांतल्या आपल्या अनुभवसिद्ध ठोकताळ्यांनी त्यांतल्या बहुतेकांचा या नाटकापुरता निकाल केलेला दिसतो.

पहिली अडचण हे नाटक सरकारी नाट्यपरीक्षण मंडळाच्या तपासणीतून सुटण्याचीच होती. परंतु या प्रकाराच्या नाटकावर आक्षेप उपस्थित करण्याचा अधिकार या मंडळाला नाही असे ठरले. म्हणजे खऱ्या नावानिशी खऱ्याखुऱ्या बऱ्यावाईट व्यक्तींवर आणि घटनांवर यानंतर कोणीही नाटके लिहिली तर यास्तव त्यांचे प्रयोग

होण्याआड एखादे सरकारी बंधन येणार नाही, असे या नाटकामुळे प्रथमच उघड झाले आहे.

रचनात्मकदृष्टचा पाहिले तर, मूळ पुराव्याचे परिशीलन करून त्यातल्या सोयिस्कर गोष्टी तेवढयाच उचलून त्यात तर्काने जरूर तेवढी भर घालून आचार्य अत्र्यांनी या नाटकाचे एक पुष्कळच सुसंगत आणि ओघवते संविधानक बांधलेले दिसते. तरीही खटल्याप्रमाणेच नाटकही लक्ष्मीबाईंच्या मृत्युनंतर त्यांना सुरू करावे लागले आहे. म्हणजे नाटकातील डॉ. लागू या पात्राचा गुन्हेगार म्हणून वा लक्ष्मीबाईंच्या खुनासंबंधातील विकास कालसंगती राखून आरंभापासून सरळ ठसठशीतपणे आणि एकसंध चढत्या रंगतीने दाखविणे मूळ खटल्याच्या मर्यादेत त्यांना शक्य झालेले नाही. तसे म्हटलें तर 'तो मी नव्हेच' मध्येही त्यांनी खटल्याची चौकट पत्करली होती; पण ती मूळ काझी खटल्याची नव्हती. 'कोर्ट-प्ले'च्या तंत्राची होती. एक प्रकारे तांत्रिक नावीन्यासाठी हे तंत्र त्यांनी तेव्हा खुषीने पत्करले होते. 'डॉ. लागू'मध्ये अव्वल नावांच्या हिशेबी आग्रहाने ही एक नकोशी मर्यादा—वस्तुत: 'कोर्ट–प्ले'चे तंत्र ह्या नाटकाने एकुलता एक चौथा अंक वगळता तसे पत्करले नसताही—या नाटकाच्या वाटयास आली आहे. याने हे नाटक लक्ष्मीबाईंच्या मृत्युनंतर पोलीस चौकशीच्या पहिल्या टप्प्याशी सुरू होते आणि न्यायालयाच्या निर्णयाशी संपते. खुनाचे सर्व संविधानक मग येते ते भूतकालीन घटनांच्या किंवा वर्तमानकालीन चौकशीच्या वा डॉक्टर लागूंना होणाऱ्या भयंकर भासांच्या अप्रत्यक्षपणे प्रत्यक्ष स्वरूपात. एवढी रचनात्मक गुंतागुंत सोडल्यास एरवी हे नाटक आचार्य अत्रे यांना जेवढे सरळ सुगम आणि बालबोध करता आले तेवढे त्यांनी केले आहे हे मान्य केले पाहिजे. इतकेच नव्हे तर ते पुष्कळ बांधीवही झाले आहे. उदाहरणार्थ पहिला अंक संगतवारपणे आणि फारसे फाटे न फुटता लक्ष्मीबाईंचा मलगा डॉक्टरांवर आपल्या आईच्या मालमत्तेच्या आणि आईच्याही अपहाराचा आरोप ठेवतो येथपासून सुरू होऊन डॉक्टरांच्या चौकशीसाठी खास नियुक्त झालेला पोलिस अधिकारी इन्स्पेक्टर राणे वळकट पुराव्यानिशी जाऊन डॉक्टरांना अटक करतो, इथे संपतो. दुसऱ्या अंकात कोठडीत डॉक्टरांचे मन डॉक्टरना हर प्रकारे छळते, खाते.

— — — —

## खून करणाऱ्या

## डॉक्टरवरचे नाटक


— — — — —

आहे हे दाखवीत लक्ष्मीबाईंच्या खुनाच्या मूळ खटल्यातील परिस्थितीजन्य पुराव्या- वर अधिष्ठित भाग रंगभूमीवर एखाद्या भयंकर स्वप्नासारखा दाखवून लक्ष्मीबाई या जगात नाही या डॉक्टरांच्या तोंडच्या कबुलीवर अंकाचा पडदा टाकण्यात येतो. तिसरा अंक मुंबईच्या जी. टी. इस्पितळाच्या आउटडोअर पेशंटस विभागात सुरू होतो. इथे डॉक्टरनी अखेरच्या अवस्थेत लक्ष्मीबाईंना 'ॲडमिट' केले आणि त्या इथेच मरण पावल्या. ही मुळातच एखाद्या रहस्यनाटयाला साजेशी चौकशी दाखवून या अंकाचा पुढचाच प्रवेश लक्ष्मीबाई–डॉक्टर यांच्या एका भूतकालीन भेटीत पोचतो आणि खुनामागचा संभाव्य हेतू (motivation) दाखवून हा अंक संपतो. चौथा अंक थेट न्यायालयातला अखेरचा टप्पा सलगपणे दाखवणारा आहे. मोजक्या घटना आणि शक्यतो स्वयंपूर्ण सलग अंक असेच या नाटकाचे स्वरूप आहे. 'तो मी नव्हेच' या आधीच्या नाटकाहून तर हे नाटक नक्कीच अधिक बंदिस्त आणि ओघवते आहे.

म्हणजे रचनेपुरता मूळ खटल्याच्या चौकटीतच आचार्य अत्रे यांनी आपला मार्ग पुष्कळ सुकर करून घेतला यात शंका नाही.

खटल्यातील व्यक्तिरेखांपैकी या नाटकात महत्त्व पावणाऱ्या व्यक्तिरेखा चार. डॉ. लागू, लक्ष्मीबाई कर्वे, इन्स्पेक्टर राणे आणि लक्ष्मीबाईंचा मुलगा राम. डॉ. लागू या व्यक्तिरेखेचे काही महत्त्वाचे आणि हृद्य तपशील अत्र्यांच्या हाती लागले. उदाहरणार्थ, आरंभीच धर्मकृत्यात निमग्न असे डॉक्टर वृंदावनाशी मरून पडलेली चिमणी पाहून कळवळतात. माणसांच्या जिवाशी खेळणारा एखादा माणूस मुक्या प्राण्यांवर तितकाच जीव करतो यातला उपरोध आणि विसंगती अशा माणसाविषयी विचार करावयाला लावणारी आहे. हिचकॉकच्या एका चित्रपटात खुनासाठी निघालेला गुन्हेगार त्याच्या घाईत एका म्हाताऱ्याला रस्ता ओलांड- ण्याला अगदी अगत्याने मदत करून मग पुढे जातो असे दाखवले होते त्याचे स्मरण या नाटकाच्या आरंभी मेल्या चिमणीसाठी डॉक्टरांना वाटलेल्या कळवळयाने होते. तसेच आपण होऊन अधिकाऱ्यांना वारंवार बोलावणी पाठवून आता सत्य सांगतो असे निकराने म्हणून पुन्हा पुन्हा हा माणूस सत्य वा धादांत असत्यदेखील सोडून बाकी काही अवांतर सांगतो हा दुसऱ्या अंकातील तपशील गुन्हेगार मनाच्या व्यापा- राचा फार मनोज्ञ प्रत्यय देणारा आहे. दुष्ट आणि सुष्ट प्रवृत्तींची चमत्कारिक शैय्यासोबत किंवा त्यांचा संघर्ष केवळ व्यवहारातच दिसतो असे नव्हे तर मानवी मनातदेखील या दोहोंची गुंफण कशी चाललेली असते ते या भागात पाहण्याला मिळते. अशा वैशिष्टयांनी केवळ एक खुनी या ढोबळ छापापलीकडे डॉक्टर लागू या पात्राला एक व्यक्तिमत्त्व लाभले आहे. आणि इतर अनेक हातखंडा युक्त्यांनी आचार्य अत्रे यांनी या उलटया काळजाच्या व्यक्तिमत्त्वाला पुष्कळ खुमारी आणली आहे.





**एक भाबडी विधवा : दोन मातब्बर व्यक्तिरेखा**

त्या मानाने एक भाबडी विधवा यापलीकडे लक्ष्मीबाई या पात्राला ते काही अधिक वैशिष्टच देऊ शकले नाहीत. तिचा मुलगा राम हाही मूळ खटल्यातील तपशीलाच्या मर्यादेत एक व्यक्तित्वहीन, सरळमार्गी पात्र राहिला आहे. अत्र्यांनी मातवर केलेले दुसरे पात्र म्हणजे इन्स्पेक्टर राणे. (सत्यसृष्टीतील नाव अत्र्यांना इथे नाटकात वदलणे भाग पडले असे दिसते. मूळ नाव वेगळे आहे. ) या प्रकरणाची चौकशी करून तड लावणाऱ्या या अधिकाऱ्याचा भरपूर गौरव अत्र्यांनी त्याच्या व्यक्तिरेखांतच करून ठेवला आहे. नाटकात भराभर त्याच्याकडे पुरावे धाव घेतात. भराभर साक्षीदार महत्त्वाचे दुवे उघड करतात. या साऱ्या तपशीलाची मांडणी याच्या मनात झरझर होते आणि क्वचित तो समोर येऊ घातलेला पुरावा

थोडा आधीच जणू जादूने जाणून त्या बळावर गुन्हेगाराला चीतपट करतो. (अंक तिसरा, इस्पितळातील प्रवेश.) पोलिसी तंत्र तर त्याला अवगत आहेच पण नाट्यही चांगले ज्ञात आहे. प्रत्येक गोष्ट तो कसबी नटाच्या हिशेबी चातुर्याने विस्मयाचे धक्के देत देत साधतो. शिवाय तो फार शिष्टाचारसंपन्न आणि सभ्य आहे; थोडक्यात तो पाताळयंत्री दुष्टांशी तोडीस तोड टक्कर देण्याएवढा बलिष्ठ आहे परंतु गर्विष्ठ वा उर्मट नाही आणि बेसावध तर नाहीच नाही. वर नशिबाचा कायम वरदहस्त त्याच्यावर आहे म्हणजे एक प्रकारे ईश्वर त्याच्या पक्षाला आहे. या नाटकातली आचार्य अत्र्यांनी विशेष प्रेमान रंगविलेली ही दुसरी व्यक्तिरेखा. खरे म्हणजे हे नाटक डॉ. लागू आणि इन्स्पेक्टर राणे या दोन पात्रांचेच आहे. बाकी सर्व पात्रे दुय्यम वा तिय्यम आहेत.

या नाटकाच्या संवादांना वाङमयीन मूल्य फारसे नाही. ते देण्याला वाव नाही आणि देण्याचा अट्टाहासही जाणवत नाही. मूळ खटल्यातील तपशील सांविधानक भरण्याच्या आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने पात्रांच्या तोंडी विभागून देण्यात आल्यासारखा जागोजाग वाटतो. मात्र ह्या अशा संवादांनाही एक ओघ आहे. आणि त्यांना मधून मधून आनुषंगिक विनोदाची आणि सुभाषितांची पखरणदेखील आहे. रचनेतला पीळ आणि संवादात पेरलेले हे असे नाट्य यांनी एका खून–खटल्याची हकीकत न्यायालयीन सत्याला धरून सांगणारे हे नाटक सहसा कोठे कंटाळवाणे होत नाही. तरीही एका गाजलेल्या सत्य खून–खटल्याची अव्वल पार्श्वभूमी हेच या नाटकातले सर्वात बलिष्ठ नाट्य आहे हे नाकारता येणार नाही. त्यामुळे या नाटकाच्या वस्तुतः तांत्रिक तपशिलाने अपरिहार्यपणे भरलेल्या मधल्याच एखाद्या नाट्यहीन, रसहीन भागातही प्रेक्षकाचे चित्त मात्र रंगमंचावर खिळून असते.

चित्त रंगमंचावर खिळवून ठेवणारे या नाटकाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे फिरत्या रंगमंचावरचे कल्पक नेपथ्य. फिरता रंगमंच हे केवळ गर्दी खेचणारे नावीन्य किंवा महागडे फॅड नसून त्याला त्याचे असे सामर्थ्य आहे आणि हे सामर्थ्य नाटकाच्या कामी चांगले राबवता येते हे मराठी रंगभूमीवर प्रथमच या नाटकात दिसते आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. रंगमंचाचे फिरणे चित्रपटातील कॅमेऱ्याच्या गतिमानतेप्रमाणे इथे वापरले आहे. पहिल्याच अंकात डॉक्टरांच्या घराचे अंगण, घराचा दिवाणखाना आणि घराचा अंतर्भाग यातून या रंगमंचामुळे प्रेक्षकांची नजर निखळपणे प्रवास करीत राहते आणि त्या त्या भागात घडणाऱ्या प्रसंगांना तुटक प्रवेशांचे स्वरूप न येता प्रसंगांची एक साखळी (Sequence) गुंफली जाते, कथानक ओघवते राहते. दुसऱ्या अंकात डॉक्टरांना कोठडीत होणारे भास दाखवताना रंगमंच थोडा थोडा फिरवून या प्रसंगाचे वेगवेगळे कोन प्रेक्षकांना देऊन त्या प्रसंगाचा परिणाम अप्रत्यक्षपणे पुष्कळ वाढवला जातो.

पुढल्या लक्ष्मीबाईंच्या खुनाच्या भास–चित्रात आगगाडीच्या अंतर्भागाचे दृश्य एका क्षयीत दोन्ही बाजूंनी आळीपाळीने फिरवून धावत्या गाडीचा भास सुयोग्य ध्वनि–योजनेच्या साहाय्याने फार यशस्वीरीत्या निर्माण केला जातो. शेवटच्या चौथ्या अंकात न्यायालयाचे दृश्यही असेच क्रमशः फिरवून चित्रपटातल्या कोनांचा (angles) परिणाम निर्माण करण्याची खटपट केली आहे. म्हणजे प्रथम न्याय-मूर्तींच्या मागून हे दृश्य प्रेक्षक पाहतात. मग सुनावणी चालू असता क्रमशः न्याय-मूर्तींच्या उजवीकडे प्रेक्षकांचा दृष्टिबिंदू (Focal Point) सरकू लागतो आणि आतापर्यंत न दिसणारे आरोपीच्या पिंजऱ्यातील डॉक्टर लागू दिसू लागतात. पुढे ते जवळ येतात आणि न्यायमूर्तींसकट सर्व कोर्ट तुलनेने मागे जाते. चित्रपटाच्या भाषेत म्हणायचे तर डॉक्टर लागूंचा हा 'क्लोजप' आहे. न्यायालयाचे हे दृश्य प्रत्यक्षात टाळचा घेते. ते या कल्पक रंगमंच–नियोजनापेक्षा सरकारी वकिलाच्या राणाभीमदेवी कडक भाषणाने. त्याचे कारण या दृश्यात या फिरत्या रंगमंचामुळेच, अशा कोनांना उठाव देणारी भव्यता येऊ शकली नाही. छायाप्रकाशाच्या योजनेने ही भव्यता कदाचित आणताही आली असती. ते काही असले तरी या नाटकाचे नेपथ्य आणि फिरत्या रंगमंचाचा त्यात करून घेतलेला उपयोग, धंदेवाईक रंग-भूमीवरील नेपथ्यात दुर्मिळ अशी अव्वल प्रतिभेची साक्ष देतो. हे श्रेय नेपथ्यकार रघुवीर तळाशीलकर आणि दिग्दर्शक दत्ता भट यांचे.

अभिनयात लक्ष्मीबाई वगळता सर्वच पात्रांच्या संवादांचा स्वर वास्तववादी सामाजिक नाटकापेक्षा ऐतिहासिक नाटकाला चालणारा भासतो. आणि एका खऱ्या खटल्याची हकीकत नावनिशीवार सांगणारे हे नाटक या पट्टीत काही वेळा उगाच भडक आणि आक्रस्ताळी होते; इतके की चौथ्या अंकात न्यायमूर्तीदेखील सर-कारी वकिलाच्या त्वेषाने आरोपी डॉक्टर लागूंच्या अंगावर ओरडू लागतात तेव्हा न्यायदेवतेची आणि डॉ. लागूंची क्षणभर दया येते ! हे वगळले तर जवळजवळ सर्वच भूमिका मनःपूर्वकतेने आणि नीटनेटक्या वठतात. त्यातही दत्ता भट यांचा या नाटकाचा नायक इन्स्पेक्टर राणे लक्षात राहतो. त्यांच्या खालोखाल लक्ष्मी-बाईंच्या भूमिकेत विमल राऊत पटतात. बापूराव माने यांची खलनायक डॉ. लागूंची भूमिका त्यांच्या स्त्रीभूमिकांचे स्मरण होऊ देत नाहीत हे मान्यांचे मोठे यश. दुसऱ्या अंकात काही जागी खुनी गुन्हेगाराच्या मानसिक द्वंद्वाचे दर्शनही ते काहीशा अतिरिक्त भावाभिव्यक्तीने परंतु चांगले घडवतात. तरीही मुलायम, मधुभाषी, सुसंस्कृत आणि दांभिक असा या नाटकातला खलनायक डॉ. लागू यांना सातत्याने पेललेला नाही. या भूमिकेची ही वैशिष्ट्ये अस्सल गहिरेपणाने अभिव्यक्त करण्याऐवजी ते त्यांना उघड उघड एक नाटकी लटकेपणा देतात आणि या भूमि-केचा बोज परिणामी कमी होऊन डॉ. लागू हा इतर चार लफंग्यांइतकाच हलका लफंगा उरतो. तो तसा नाही हाच खरे तर नाटकातला मुख्य प्रतिपाद्य मुद्दा आहे.

हृदयनाथ मंगेशकर यांचे पार्श्वसंगीत नाटकातील भयावह भागांना चांगला उठाव देते आणि अन्य जागी नुसतीच शोभा देते. कारण एरवी खरे म्हणजे त्याला या नाटकापुरते काही काम नाही. भयावहता सोडल्यास या नाटकाला अन्य कोणताही स्थिर असा 'मूड' नाही; तर पार्श्वसंगीत उठाव कशाला देणार?

हे सर्व उणे अधिक जमेस धरून असे म्हणता येईल की, अनेक दृष्टींनी एक चित्तवेधक नाटक रंगभूमीवर आले आहे आणि दीर्घकाळ ते रंगभूमीवर राहणार आहे. 'तो मी नव्हेच' पेक्षा त्याचे लेखन आणि त्याचा प्रयोग सरस आहे. तरीही 'तो मी नव्हेच' च्या नायकाचे पावलापावलाला आणि बाई–बाईगणिक रंगरूप बदलण्याचे चलाख कसब या नाटकाच्या खलनायकाला अवगत नसल्याने एवढ्या बाबतीत 'तो मी नव्हेच' अनेकांना उजवे वाटत राहील. कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या, शेवटी दोन्ही एकाच अ-जरा लेखणीचे आविष्कार! ○

मुंबईसारख्या उत्सवप्रिय, दानशूर, उपक्रमशील आणि चळवळ्या महानगरात सध्या आठवड्याला सरासरी एक षष्ठ्यब्दी पडू लागली आहे. यातल्या एखादीसाठी माणसे वाऱ्यापावसाची तमा न करता दूरदूरच्या ठिकाणांहून गर्दीने जमतात. अशी संस्मरणीय षष्ठ्यब्दी मध्यंतरी २३ ऑगस्टला रात्री सिड्न्हॅम कॉलेजच्या नाट्यगृहात झाली. नाट्यगृहातील या षष्ठ्यब्दीचे 'हीरो' होते प्रसिद्ध संगीत-तज्ज्ञ वामनराव देशपांडे. 'घरंदाज गायकी' नावाचा संगीताचे शास्त्रीय संशोधन मांडणारा एक ग्रंथ त्यांनी अलीकडे लिहिला आहे. याशिवाय संगीतावर एकाच वेळी तर्कशुद्ध आणि रसीली भाषणे ते करू शकतात. गाण्याची प्रदीर्घ तपश्चर्या त्यांनी कितीएक वर्षे केली आहे. आणि मुंबईतील अनेक संगीत बैठकींत बिनीचे रसिक श्रोते हे त्यांचे सर्वमान्य स्थान असते. केवळ आपल्याला दाद देण्याचे. त्यांनी सावरलेल्या पडत्या बैठकींची रुजवात खुद्द या समारंभात व्यासपीठावरून झाली. व्यवसायाने ते अकौंटंट आहेत याही गोष्टीचा सर्वांनी आपापल्या भाषणांत आवर्जून उल्लेख केला. प्रा. अनंत काणेकर यांनी तर असेही सांगून टाकले की आपण या माणसावर मागे 'गाणारा

अकौंटंट ' म्हणून एक नाटिकादेखील लिहिली होती ! वस्तुत, डॉक्टर जर नट असू शकतात आणि प्राध्यापक कवी असू शकतात तर अकौंटंटने गाणारा असण्यात एवढी अपूर्वाई आपल्या मनात का उरावी हा प्रश्नच आहे. पण ती आहे खरी.

या समारंभात काणेकरांनी, वामनरावांकडून संगीतविषयक ज्ञान गोळा करून त्या मालमसाल्यावर आपण मागे एकदा साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांशी संगीतावर कसा जाहीर आणि छापील वाद केला होता त्याची रोमहर्षक जुनी आठवण सांगितली. याची प्रेमळ परतफेड नंतर आपल्या भाषणात वामनरावांनी, आपला पहिला लेख आपल्याला काणेकरांनी लिहून दिला होता हे प्रथमच या प्रसंगी जाहीर करून केली. काणेकरांशिवाय प्रा. गंगाधर गाडगीळ, प्रा. अरविंद मंगरूळकर, कोल्हापूरचे संगीतवेडे वकील बाबूराव जोशी, अध्यक्ष न्यायमूर्ती चंद्रचूड असे वामनरावांचे अनेक स्नेही वामनरावांबद्दल माणूस आणि संगीततज्ज्ञ म्हणून विविधप्रकारे गौरवून बोलले. ही सारी भाषणे तटस्थपणे आणि अगदी बालसदृश

# ' गाणाऱ्या अकौंटंट 'ची षष्ठ्यब्दी

कुतूहलाने ऐकून शेवटी वामनराव बोलले ते अशा प्रसंगी रीतसर असा भावनावेग न आणता, खोटा विनय न दाखवता आणि आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी. अशा प्रसंगी अलीकडे फॅशनेबल असे संगीतातले पेटंट शब्दप्रयोग (षड्ज, गांधार, पंचम, भैरवी, अंतरा इ. इ.) न वापरता, आधीच्या भाषणांबद्दलच ते म्हणाले, ही करणारां-पेक्षा माझ्यात काय काय कमी आहे ते मला कळू शकते. हेच माझे असले तर थोडे मोठेपण. या भाषणांना अनेक जागी टाळ्या मारण्याचा मोह मला अनावर होत होता. असेही वाटले की ज्याच्याविषयी हे सगळे हे एवढे गौरवून बोलत आहेत तो महाभाग एकदा आपल्याला भेटला तर काय बहार होईल !

गाणारा अकौंटंट या आपल्याविषयीच्या नवलाचा उल्लेख करून वामनरावांनी अकौंटन्सीच्या त्यांच्या फर्मचे दिवंगत ज्येष्ठ भागीदार आणि जुने मालक श्री. बाटली-वाला यांचा आपल्याही आधीचा ' गाणारा अकौंटंट ' म्हणून गौरव केला. आपल्या संगीत व्यासंगाविषयी ते म्हणाले, ज्या काळात घरंदाज ब्राह्मण घरात संगीताला शिरकाव नव्हता तेव्हा माझ्या वडिलांनी संगीताचा नाद मला लावला आणि अभिमानाने जोपासू दिला म्हणून मी जो आहे तो आहे. आम्हा भावांत भाऊबंदक्या होत आल्या त्या इस्टेटीवरून नव्हेत—कारण वाटून घेण्याजोगी इस्टेटच आमच्याकडे नव्हती—आम्ही भांडलो, अजूनही भांडतो ते संगीतातल्या अनेक प्रश्नांवर. संगीत

हीच आमची वडिलार्जित इस्टेट आहे. आणि या इस्टेटीवर आम्ही मांडतो तेही असे तटीने की आमच्या बायका आमच्या अवसानांनी प्रथम प्रथम घाबरून जात. आता त्यांना सवय झाली आहे.

सर्व ऋणनिर्देश करून वामनराव खाली बसले आणि पुढल्या सोहळ्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने पुन्हा दूरध्वनीक्षेपकापुढे उभे राहिले. आपल्या आधीच्या भाषणाला त्यांनी एक ताजा कलम जोडला. ते म्हणाले, माझ्या आजच्या या सन्मानाचे श्रेय ज्यांचे त्यांना देताना एक महत्त्वाचा वाटा राहिला तो आज दिला पाहिजे. व्यासंगी माणसांनी असे चुकूनही समजू नये की आपला गौरव हा सर्वस्वी आपल्या तपस्येचे फल आहे. वस्तुतः त्यांच्या व्यासंगाच्या खस्ता विनाश्रेय, बिनतक्रार आणि प्रसंगी हास्यमुखाने या आयुष्यभर निष्ठेने खात असते त्या त्याच्या अर्धांगीचाही तो गौरव असतो आणि असला पाहिजे. असे म्हणून आपल्या सहधर्मचारिणीविषयी जाहीर कृतज्ञता वामनरावांनी व्यक्त केली तेव्हा संमिश्र श्रोतृसमुदायातून टाळ्यांचा नुसता पाऊस पडला !

अशा या सोहळ्याची सांगता वामनरावांच्या गानकलेतील गुरू श्रीमती मोगूबाई कुर्डीकर यांच्या गायनाने झाली. वामनरावच नम्र अभिमानाने म्हणाले, त्याप्रमाणे गुरूच्या गौरवप्रसंगी अनेक शिष्य गाऊन गेले असतील, पण शिष्याच्या गौरवासाठी गुरूने गाण्याचा हा निराळा प्रसंग होता. आणि वामनरावांहून वयोवृद्ध असे त्यांचे गुरू फार जीव ओतून, अनपेक्षित तडफेने आणि रंगून गायले. इतके की वामन-रावांच्या या गौरवापुढे त्यांच्याविषयीची सारी रसाळ भाषणे आणि पुष्पहारांचे व्यासपीठावरचे विलोभनीय ढीग किंचित्काल फिके वाटले. आणि संगीताच्या एका निस्सीम उपासकाचा गौरव अशा स्वर्गीय स्वर-मालिकांनी व्हावा हे एकापरी अन्वर्थकच नव्हे काय ?

# पद्मा नदीवरील नावाडी

*दुसरे दिवशी सकाळीच यात्रेच्या ठिकाणी आपला माल विकता यावा म्हणून पद्मा नदीवरील एका नावाड्याने आपल्या नावेत माल भरला व तो रात्रीच निघाला. रात्रभर नाव वल्हविल्यास तो सकाळी यात्रेच्या ठिकाणी पोहचू शकणार होता. नदीच्या पात्राभोवती दाट अंधार होता. आपल्याला किती कमाई होईल याची स्वप्ने रंगवीत त्याने उत्साहाने रात्रभर नाव वल्हविली.*

*आणि काय आश्चर्य? उजाडल्यावर त्याला आढळून आले की तो जेथून निघाला होता तेथेच होता! हे कसे झाले? त्याचे कारण नदीचा प्रवाह उलटा वाहात होता. अन् त्याने नावेची गती स्थिती इतकी स्थिर केली.*

आपल्या देशाची स्थिती अशीच आहे. नागरिकांचे जीवनमान सुधारण्याचे प्रयत्न चिकाटीने २० वर्षे केल्यानंतर (काही बाबतीत प्रगती झाली असली तरी सामान्यतः) आपण पूर्वस्थितीपासून फारसे पुढे गेलेलो नाहीत. अन्नधान्याच्या उत्पादनाचेच उदाहरण घ्या. १९५१ पासून १९६५ पर्यंतच्या १४ वर्षांत आपण ते १७० लाख टनांनी वाढविले. पण प्रत्येकाला आज पूर्वीपेक्षा ०.४ औंस कमीच अन्नधान्य मिळत आहे. नोकऱ्या मिळविण्याच्या अथवा शिक्षणाच्या सोयींच्या अशा अनेक क्षेत्रांतही आपली प्रगती नष्ट केली आहे ती लोकसंख्येच्या वाढीने. दरसाल आपली लोकसंख्या सुमारे १३० लाखांनी वाढते. तेव्हा सर्व गोष्टी कितपत पुराव्यात?

पण आतापासूनच कुटुंब नियोजन केल्यास निदान पुढे तरी सुखाचे दिवस दिसतील. त्यासाठी नजीकच्या कुटुंब नियोजन केंद्रात जाऊन सल्ला घ्या. मोफत सेवासोयी उपलब्ध आहेत. लक्षात ठेवा: ▽ लाल त्रिकोण ही कुटुंब नियोजन केंद्राची खूण आहे



▽

संतती थोडी असावी
दोन वा तीन मुले पुरेत

davp 67/190

# रामदुलारीचा बचवा


यशवंत जोशी

लहानपणी प्राणघातक अपघातात सापडून वाचलेली मुलं पुढं उत्तरायुष्यात महत्-पदाला चढतात की काय कुणास ठाऊक ? इ. स. १६४९ मध्ये इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स याचा वध झाला. आणि ऑलिव्हर क्रॉम्वेल यानं इंग्लंडची राज्यसूत्रे आपल्या हातांत घेतली. १६४९ ते १६६० ही अकरा वर्षे राज्य करून त्यानं त्या कारकीर्दीत विलासी आणि चैनी इंग्लंडचं रूप साफ बदलून टाकलं व इंग्लंडच्या इतिहासात आपलं नाव अजरामर करून ठेवलं.

हा ऑलिव्हर क्रॉम्वेल एका गरीब परटाचा मुलगा होता. तो अगदी लहान असताना एकदा त्याची आई त्याला नदीकिनारी एका पटकुरावर टाकून कपडे धूत होती. जवळच असलेल्या एका झाडावर बसलेल्या वानरीने पटकुरावर पडलेला हा लाल चुटूक मांसाचा गोळा पाहिला आणि तिला त्याचा मोह वाटला. ती उडचा मारीत झाडावरून उतरली आणि मुलाला पोटाशी घेऊन सरसर झाडावर चढली. नदी-किनारी असलेल्या माणसांना भीती वाटली. आता हे पोरगं कसं वाचणार ? वान-रीला खाली उतरविण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला, परंतु तो निष्फळ ठरला. शेवटी एक शहाणा माणूस पुढं आला आणि त्यानं झाडाखालची सर्व गर्दी हटविली. गर्दी दूर होताच वानरी झाडावरून उतरली आणि तिनं मुलाला अलगद पुन्हा पटकुरावर ठेवून ती पुन्हा झाडावर चढली. क्रॉम्वेल वाचला. इंग्लंडच्या इतिहासात एका नेत्याचे नाव नमूद झाले.

नेपोलियन बोनापार्ट आणि महादेव गोविंद रानडे यांच्या बालपणांतही असेच प्राणघातक अपघात घडून त्यांतून ते वाचल्याच्या आठवणी त्यांच्या चरित्रांत सापडतात.

आपले दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचीही अशीच एक गंमतीदार आठवण आहे. शास्त्रीजींचा जन्म उत्तर प्रदेशातील रामनगर गावच्या एका कायस्थ कुटुंबात झाला. त्यांचे वडील शारदाप्रसादजी अलाहाबादच्या कायस्थ पाठशाळेत अध्यापक होते. त्यांचं कुटुंब अहियापूर मोहल्ल्यात राहत असे.



**लाल बहादुरजींचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ सालचा.** ते साल माघी मेळ्याचं होतं. देशाच्या कोनाकोपऱ्यांतून भाविकांचे लोंढेच्या लोंढे अलाहाबादला लोटत होते. अलाहाबादमध्ये लोकांची अफाट गर्दी जमली होती. १४ जानेवारी हा संक्रांतीचा दिवस. त्या दिवशी संगमावर जाऊन स्नान करणं म्हणजे महत्पुण्य ! शास्त्रीजींच्या मातोश्री ' रामदुलारीदेवी ' साडेतीन महिन्यांच्या आपल्या ' बचवा 'ला खांद्यावर घेऊन पतिसंगे संगमावर जाण्यास निघाल्या. आधीच माघी मेळ्याची गर्दी, त्यात संक्रांतीचा दिवस. गर्दीला जणू भरतीच आली होती. किल्ल्यापाशी किनाऱ्यावर नाव ठरवणं आणि तीत बसणं ही मोठी कसरतच होती. शिवाय धक्का इतका अरुंद, की स्वतःचा तोल सांभाळणं कठीण होतं. रेटारेटी, धक्काबुक्की इतकी वाढली की, रामदुलारीजींच्या खांद्यावरून बचवा कधी निसटला आणि कुठं पडला हे क्षणभर त्या माऊलीला समजलंच नाही. खांद्यावरून मुलगा नाहीसा होताच त्यांनी आक्रोश सुरू केला. तावडतोब शोधाशोध सुरू झाली. शारदाप्रसादजी आप्तेष्ट, इष्ट मित्रांसह जारीनं मुलाला शोधू लागले; पण मुलगा सापडेना. रामदुलारीदेवीजींनी मुलगा मिळेपर्यंत किनाऱ्यावरून न हलण्याचा निश्चय केला. मुलगा कुठंच सापडेना. शेवटी रामदुलारीजींनी गंगेला नवस बोलला, " गंगामाई, माझा बचवा मला परत मिळाला तर त्याचं लग्न होताच नव्या नवरीकडून तुझी ओटी भरीन. " मुलाला शोधण्याचं काम चालूच होतं.

संगमाकडं जाण्यासाठी लोकांची जशी गर्दी झाली होती, तशीच त्यांना नेण्यासाठी नावांचीही धक्क्यापाशी रेटारेटी चालू होती. जी नाव भरे ती झपाट्यानं संगमाकडं वळे. अगाच एका संगमाकडं वळणाऱ्या नावेच्या टोकाला एका दूधवाल्यानं एक टोपली ठेवली होती. धक्क्यावरील रेटारेटीत रामदुलारीजींच्या खांद्यावरून शास्त्रीजी निसटले ते अलगद या टोपलीत येऊन पडले. नाव झपाट्यानं संगमाकडं निघाली होती. मूल टोपलीत केव्हा पडलं हे नावेतील लोकांनाही बराच वेळ कळलं नाही. नावेनं थोडं अंतर कापताच दूधवाल्याचं लक्ष आपल्या टोपलीकडं गेलं. पाहतो तो

दुपट्यात गुंडाळलेलं एक मूल. त्याला आनंद झाला; कारण त्याला स्वतःला मूल नव्हतं. हे मूल कुणाचं ? कुठून आलं ? कसं आलं ? नाव निघाली तोपर्यंत तर नव्हतं ! सारेच थक्क झाले.

परंतु दूधवाला मात्र आनंदून गेला. परमेश्वरानंच जणू आपल्याकडं हा बाळजीव धाडला असं वाटलं. त्याचे सगेसोयरे बरोबर होते. ते म्हणू लागले, की गंगामाईनं तुला हा प्रसादच दिला आहे, मोठा भाग्यवान आहेस. तुझं अभिनंदन.

दूधवाल्यानं मुलाला उचललं. त्यानं ओलं केलेलं दुपटं सोडून टाकलं. त्याच्याजवळ दुसरा कपडा नव्हता. त्यानं लगेच आपली बाराबंदी सोडली आणि अंगातून काढून त्यात ते मूल गुंडाळलं. ते रडू लागताच कापडाच्या बोळयानं त्यानं हंडयातील दूधसुद्धा पाजलं. मूल मिळाल्यामुळं तो मोठ्या खुषीत होता.

काही वेळानं संगमावरून नाव परतली. दूधवाल्यानं मूल टोपलीतच ठेवलेलं होतं. धक्क्यावर लोकांची गर्दी होतीच. मुलाला शोधण्याचं काम अद्याप संपलेलं नव्हतं. नाव धक्क्याला लागताच शास्त्रीजींच्या वडिलांना टोपल्यात ठेवलेलं मूल दिसलं. त्यांनी मुलाला उचलताच दूधवाला रागावला. तो भांडू लागला. मूल देईना. शास्त्रीजींचे वडील मुलाला सोडीनात. दोघांमध्ये बोलाचाल सुरू झाली. बघ्यांची गर्दी गोळा झाली.

शेवटी मुलगा कुणाचा ? हे सिद्ध करण्यासाठी रामदुलारीजींना बोलावण्यात आलं. त्यांनी 'बचवा'ला पाहताच त्याच्यावर जणू झडपच घातली आणि चटकन आपल्या पदराखाली घेतलं.

खरा प्रकार सिद्ध होताच गर्दीतील लोक दूधवाल्यावर उलटले. त्यांनी त्याला खूप दम दिला. त्याचा नाइलाज झाला. तो अगदी खट्टू झाला. तरी पण त्याचा राग गेला नव्हता. शास्त्रीजींच्या वडिलांपाशी जाऊन तो म्हणाला, "तुमच्या मुलानं माझी बाराबंदी खराब केली. ती स्वच्छ करायला हवी. ही ओली बाराबंदी अंगात घालून या थंडीत मी घरी कसा जाऊ ?" शास्त्रीजींच्या वडिलांनी आपल्या अंगावर ओढलेली लोकरीची चादर त्याला देऊन टाकली. इतक्यानंही त्याचं समाधान होईना. नावेत पाजलेल्या दूधाचेही तो पैसे मागू लागला. शास्त्रीजींच्या वडिलांनी त्याला पाच रुपये देऊन टाकले.

नंतर छोट्या 'बचवा'ला घेऊन सारी मंडळी घरी परतली.

शास्त्रीजींचं लग्न १६ मे १९२८ रोजी झालं. त्यानंतर त्यांच्या मातोश्री नव्या सुनेला आणि मुलाला घेऊन गंगेवर आल्या आणि त्यांनी सुनेच्या हातानं गंगेची ओटी भरली.

श्रीमती ललितादेवींनी याचं प्रयोजन काय असं सासूबाईंना विचारताच, रामदुलारीजींनी 'बचवा'च्या बालपणची ही आठवण आपल्या लाडक्या सुनेला ऐकविली. ○




## लाजोस कासॅक

रूपांतर – श्याम तारे

भर उन्हाळ्यातली एक सकाळ. व्हिएन्नामधल्या अरुंद रस्त्यावरून बाजाराच्या पिशव्या घेतलेल्या अन् उंच टाचांच्या चपला घातलेल्या बायका ये–जा करताहेत. माणसंही कोटाची बटनं उघडी टाकून आणि टोप्या पार मागे सरकवून इकडे तिकडे हिंडत असतात. ही सारीजणं एकमेकांना ओळखतात. जाणाऱ्या–येणाऱ्या बायकांशी ही माणसं शब्दांची देवघेव करतात आणि त्या बायकांचे निस्तेज खोल गेलेले डोळे कसल्यातरी तेजानं चमकल्यासारखे भासतात. काही अदृश्य धाग्यानं बांधल्यासारखी ही माणसं दिसतात... पण हा एक वेगळाच वाटतो. याची कुणीच दखल घेतली नसावी असं वाटतं.

रस्त्याला लागूनच असलेल्या एका ठेंगण्या लालवट विटांच्या भिंतीवर तो बसलेला दिसतो. त्या भिंतीपलीकडे सात एक फूट अंतरापर्यंत नुसताच कचरा पडलेला असतो त्याच्याही पलीकडे एक छोटंसं घर आहे.

घरात सारं काही शांत असावंसं वाटतं. खिडक्यासुद्धा बंद केलेल्या... घराचं दार एखाद्या काळ्याकुट्ट गुहेच्या दरवाजासारखं भीतिदायक... आणि घरातून कसलासा घाणेरडा वास त्या दारावाटे बाहेर पडतोय... हवेत मिसळतोय...

हा भिंतीवर बसलेला माणूस चांगलाच तरुण आहे. त्याच्या ओठावरल्या मिशा नाकाखाली दोन मोठाल्या माशा बसल्यागत – ऐटदारपणे कापलेल्या दिसताहेत... तो रागात असावा... किंवा काहीतरी बिघडलेलं असावं त्याचं... कारण त्यानंही आपली टोपी पार डोक्याच्या मागच्या भागाला सरकवून दिलीय... मध्येच तो समोर पसरलेल्या सोंगट्यांच्या पटाकडे लक्ष देतो. थोड्याच वेळापूर्वी तो कागद त्यानं भिंतीवर पसरून ठेवलाय... मग तो दोन प्रकारच्या सोंगट्यांनी स्वतःच खेळू लागतो... काही सोंगट्या घोड्याच्या तोंडाच्या आकाराच्या तर काही ठिपकेदार सोंगट्या असतात.

— — — — — — — — —

### *' मूळ लेखकासंबंधी*

*७८ वर्षांचे लाजोस कार्सक हे विसाव्या शतकातील हंगेरीचे एक अर्थपूर्ण लेखक मानले जातात. साहित्याच्या इतिहासाचेही ते एक दर्दी आहेत. आतापर्यंतच्या त्यांच्या साहित्यकृतींपैकी कवितांचा भाग फार मोठा असून चित्रकलेवरही त्यांचे नितांत प्रभुत्व आहे.*

*श्री. कार्सक यांच्या चित्रांचं पहिलं प्रदर्शन अनेक वर्षांपूर्वी व्हिएन्ना इथं भरलं होतं. तेव्हापासून नुकत्याच बुडापेस्ट येथे पुन्हा भरलेल्या त्यांच्या चित्रप्रदर्शनाचं सबंध युरोपमध्ये कौतुक करण्यात आलेलं आहे.*

*तरुणपणी १९०५ साली कामगार म्हणून काम करणाऱ्या श्री. कार्सक यांनी हंगेरीच्या सार्वत्रिक सत्याग्रहांमध्ये महत्त्वपूर्ण कार्य केलेलं आहे. १९०८ साली त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाली. पहिल्या महायुद्धाच्या काळात त्यांनी १९१५ साली काढलेल्या* Tett *( कर्तृत्व ) या नियतकालिकावर १९१७ मध्ये बंदी घालण्यात आली. त्यानंतर त्यांनी '* Ma *' ( आज ) नावाचे दुसरे नियतकालिक सुरू केले.*

*त्यानंतरच्या काही वर्षांचा काळ त्यांनी व्हिएन्ना येथे घालवला. या काळात एक विशिष्ट साहित्यिकांची प्रभावळ त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने आपलीशी करून घेतली. नंतर ते हंगेरीमध्ये परत आले.*

*अनेक काव्यसंग्रहांबरोबरच श्री. कार्सक यांनी इतरही लिखाण पुष्कळच केलेले*

एखादी ठिपकेदार सोंगटी बाद झाली की त्याला हसू येतं... त्या ठिपकेदार सोंगटीच्या स्पर्शानं त्याच्या मनात खूप आठवणी उभ्या राहतात. तो खूप खूप जुन्या काळात रंगून जातो. शेजाऱ्याची एक घोडी त्याला आठवते... घाणेरडी... खूपच रोडावलेली .. हाडकं वर आलेली... तिला गाडीला जुंपलेलं असायचं... मग ती कशीतरी स्टेशनापासून लोहाराच्या दुकानापर्यंत लोखंडी सामान आणून टाकायची... ती घोडी पाण्याला खूप भ्यायची... मग काही टोळभैरव मुद्दाम तिच्यावर स्वार होऊन तिला नदीच्या प्रवाहात ढकलायचे... खूप खूप मजा असायची...

अजूनही तो तिथंच भिंतीवर बसलेला असतो. एक सोंगटी उचलता–उचलता त्याला स्वत:ची उघडी मांडी दिसते... एका छोट्याशा घोड्यावर बसून रपेट करताना जाणवलेली ती विचित्र संवेदना त्याला आता आठवते... फारच विचित्र संवेदना असते नाही का ?... अन् त्याच्या चेहेऱ्यावर नकळतच हसू उमटतं.

एकाएकी तो दचकतो. एका परिचित आवाजानं तंद्रीतून जागा होतो. समोर एक गृहस्थ उभा असतो... नकोसा वाटणारा... कदाचित तो तिथं त्याच्या समोर गेले कित्येक ताससुद्धा उभा असेल... आपल्याकडे पाहत... त्याला वाटतं...

— — — — — — — — —

*थोडंसं.... '*

*आहे. आठ भागांमध्ये प्रकाशित झालेली आत्मचरित्रात्मक कादंबरी* ' The life of a man ' *ही त्यांपैकीच एक. श्री. कार्सेक यांच्या लिखाणाची अनेक भाषांमधून भाषांतरे झालेली आहेत.*

*अनेक नियतकालिकांच्या संपादकत्वाची जबाबदारी सांभाळून श्री. कार्सेक हे अजून विधायक चित्रकले* (Constructivistic Painting)*मध्ये भरपूर रस घेतात.*

' Angyalfold (Land of Angeles–*पऱ्यांची भूमी* )' *या त्यांच्या कादंबरी-वरून तयार केलेल्या चित्रपटाने* ' Mare Del Plata ' *चित्रपटमहोत्सवात प्रथम पारितोषिक मिळवलेले आहे.*

*यंदाच्या वर्षीचे हंगेरीचे सर्वश्रेष्ठ साहित्यिक मानदर्शक* ' Kossuth ' *पारि-तोषिक श्री. कार्सेक यांना देण्यात आलेले आहे.*

*...' सोनेरी पिसांची वर्तुळं ..' हा श्री. कार्सेक यांच्या* The Murderer (Hungarian Review–9–65) *या कथेचा अनुवाद...*

*' ...खून केल्यानंतर तो विसरू पाहणाऱ्या एका माणसाच्या मनाची ही आंदोलने श्री. कार्सेक यांनी अत्यंत समर्थपणाने दाखविली आहेत...'*

*' स्वतःच्या बायकोचा खून केल्यानंतर त्याचे विचार मनातून काढून टाकण्याच्या प्रयत्नांत असलेल्या ' पीटर 'ची ही कथा...'*

'कसं काय पीटर ?' तो गृहस्थ उद्गारतो, 'आज काही काम नाही वाटतं ?'

पीटर आपला खेळ थांबवतो आणि एक सोंगटी दोन्ही तळव्यांमध्ये खेळवू लागतो... हळू हळू... हळू हळू... विचारमग्न असल्यासारखा...

'नाही.' तो उत्तरतो.

'म्हणजे ?' तो प्रश्न विचारणारा गृहस्थ आश्चर्य दाखवतो. त्याचं नाव गॅबोर असतं... एका अतिशय वेड्यावाकड्या जखमेची खूण त्याच्या पूर्ण चेहऱ्यावरून आडवी गेलेली दिसते. तो अतिशय खालच्या दर्जाचा आणि नीच माणूस असावा असं त्या लालसर खुणेमुळे वाटतं. कदाचित कारखान्यातल्या एखाद्या अपघातानं त्याच्या चेहऱ्यावर ती खूण उमटली असेल. परंतु त्या खुणेमुळे त्याचा चेहरा भयानक दिसतो एवढं मात्र खरं... तरीही त्याचा चेहरा जणू काही घडलंच नाही असा नेहमी हसरा असतो.

'भल्या गृहस्था, नऊ वाजायला आलेत अन् तू अजून इथंच ?... फॅक्टरीत जायचं नाही वाटतं ?' गॅबोर विचारतो... हसत हसत...

'मला नाही करायचं काम... अन् तू करतोयस तर तुला काम केल्यानं काम जास्त मिळतंय ?... काम केल्यानं काही जास्त मिळत नाहीय अन् ते न केल्यानं उपाशी राहावं लागत नाही...' पीटर जरासा घुश्श्यातच उत्तर देतो.

'अन् तुझी बायको काय म्हणतेय तुझ्या अशा विचारांबद्दल ?'

'ती झोपलीय.'

'झोपलीय ?'

'हो. तिला झोप लागलीय.'

गॅबोर थोडा भिंतीजवळ सरकतो. भिंतीच्या कडेवर हात टेकतो अन् हातांचा आधार देतादेताच पटकन उडी मारून पीटरजवळ येऊन बसतो.

'चल. आपण खेळू या !' तो म्हणतो.

पीटर ठिपकेदार सोंगट्या स्वतःसाठी घेतो. जणू काही या सोंगट्या छानदार गरमागरम असतात, तर त्या दुसऱ्या पांढऱ्या सोंगट्या निसरड्या... थंडगार... झालेल्या असतात. मग खेळ सुरू होऊन थोडा वेळ निघून जातो तरी कुणीच काही बोलत नाही... सोंगट्या हलवल्या जातात... त्याही मुक्यानंच... गॅबोरचा मधूनच खाकरण्याचा आणि घसा साफ करण्याचा आवाज येतो तेवढाच.

पीटरची पावलं भिंतीवर ताल धरतात. कुठल्या गाण्याचा ताल त्याची पावलं धरताहेत हेसुद्धा त्याला समजत नाही. कदाचित त्याची पावलं ताल धरताहेत हेही तो विसरून जातो. ती क्रियासुद्धा त्याच्या नकळतच होते जणू... त्या सगळ्याच क्रिया आपोआप होताहेत.... कदाचित हे सगळं गॅबोरला फसवण्याकरता सुद्धा चाललं असेल... कुणास ठाऊक... पण ह्या गोष्टींचा विचार करण्याचीसुद्धा पीटरला शक्ती उरलेली नसते.

खरं म्हणजे कदाचित तो त्या भिंतीवरसुद्धा बसला नव्हता... अदृश्यपणानं तो एका खोलीत बसला होता... त्या भिंतीपलीकडल्या घरातल्या... एक छोटीशी खोली... एकच एक रस्त्याच्या बाजूला असलेली खिडकी... थोडंसं फर्निचर भिंतीलगत ठेवलेलं... एक अस्ताव्यस्त बिछाना. एका कोपऱ्यात पडलेला... मधल्या भिंतीजवळचा एक सोफा... आणि त्या सोफ्यावर झोपण्याची सवय असलेली पीटरची बायको...

खेळता खेळता मधूनच गॅबोर काही प्रश्न विचारतो... पीटर उत्तरादाखल थोडंसं हसतो. त्याला वाटतं... तो स्वत: एका खोलीत बसून खिडकीतून त्या भिंतीवरच्या माणसांना सोंगट्या खेळताना बघतोय... आणि हे सारं गॅबोरपासून लपवून ठेवण्यात तो यशस्वी झालाय... कदाचित ती भिंतीवर बसलेली माणसं संशयास्पदसुद्धा असू शकतील... कदाचित तो संशय त्यांच्याचपैकी एकावर उलटणार असेल...?

'काल रात्री मला झोपच लागली नाही त्यामुळे आज मला कामावर जावंसं वाटत नाही' मध्येच पीटर म्हणतो, 'रात्री बायकोशी खूप गप्पा मारल्या...ती खूपच चांगलीय आणि तिला आता एक बाळ सुद्धा होणाराय.'

गॅबोर एकदम मोठ्यानं ओरडतो, 'काय? तिला मूल होणाराय?... पण... पण आजकाल मुलं होणं कसं परवडेल?... माझं वय छत्तीस वर्षांचं आहे. पण लग्न करायचा विचारसुद्धा माझ्या मनात येत नाही... आता म्हातारी आई आहे म्हणून... पण ती नसती तरीसुद्धा एकट्याचंच कसं तरी भागलं असतं ह्या काळात...!'

'हं! मी सध्या सुखी आहे त्यामुळे असल्या गोष्टींचा मुळी मी विचारच करीत नाही. पीटर बोलता बोलता गॅबोरकडे हळूच पाहून घेतो. गॅबोरला काय वाटतंय हे बघायची त्याची इच्छा असते.' पण गॅबोर अगदीच मूर्ख आहे हेही चांगलंच नाही का?' पीटरला वाटतं... 'याला सगळं काही खरं सांगून टाकलं तरी काही समजायचं नाही.'

गॅबोर नुसताच सोंगट्या खेळवीत बसला असतो. मध्येच तो शीळ घालण्यासारखी ओठांची दुमड घालतो... शीळ घातल्यासारखी...

शीळ... बस्स .. शीळ म्हणजे पक्ष्यासारखी... पीटरच्या मनात विचार येतो. प्रत्येकानं दु:खातच मरावं असं कुठंय...? खरं म्हणजे तिच्या मृत्यूबद्दल लोकांना वाईट वाटावं इतकी तिची लायकीच नाहीय... ती तर तिथं हातपाय ताणल्यासारखी पडलीय... सोफ्यावर... मरताना तिच्या घशातून आवाजसुद्धा झाला नाही... आता सगळं काही ठीक ठीक होणाराय... जसं व्हायला हवं होतं तसंच .. पण तिनं तरी माझं का ऐकू नये? नेहमी कुरबुर का करावी...? लहानपणी मांजरीची केलेली गंमत त्याला आठवते... अगदी असेच मी त्या मांजरीचे गळे आवळले होते... कुरकुरणाऱ्या... अन् दूर गावाबाहेरच्या ओढ्यात त्यांना एकामागोमाग एक असं फेकून दिल्याचंही त्याला आठवतं... त्याही हिच्या सारख्याच

कुरकुर करायच्या... पण काल रात्री तिला फेकायला ओढासुद्धा कुठं सापडणार होता जवळपास...? नाहीतर शांतपणे दिलं असतं तिलाही फेकून त्या ओढयात...! पण सारं काही चांगलंच आहे म्हणा! पीटरला आता त्याबद्दल काहीच वाटत नाही .. फक्त आता त्या सगळया घटनांच्या आठवणीनं त्याच्या हातांना काहीसा वेगळयाच प्रकारचा थरकाप सुटतो... पण तो कंप थांबतो अन् पीटरला वाटतं त्याची बोटं रखरखीत आणि कडक व्हायला लागली आहेत...! तो स्वतःच्या हातांनी चेहेरा झाकून घेतो.

गॅबोर त्याच्याचकडे पाहत असतो

'तुझं मन ठिकाणावर नाही दिसत...? तुला बरं नाही का वाटत?' तो विचारतो... सहजच...

' तसंच काही नाही. पण प्रत्येकालाच कधी ना कधीतरी असे अनुभव येतातच... नाही का?'

'लग्न झाल्यानंतर सगळं काही ठीक होतं याच्यावर तर माझा मुळीच विश्वास नाहीय.' गॅबोर म्हणतो.

'छे! छे! मला तसलं काहीच म्हणावयाचं नव्हतं... मी एका मुलीच्या विचारांत होतो... चांगली श्रीमंताची पोरगी आहे... माझी तिची काही वर्षांपूर्वीच ओळख झाली... फारच छान दिसते हं ती...! फारच सुंदर ..!

'चांगल्या घराण्यातली मुलगी...? अच्छा! तुझी अन् तिची कशी काय ओळख झाली?'

गॅबोर विचारपूर्ण नजरेनं पीटरकडे बघतो.

'अं! अशीच! गेल्या वेळच्या राज्यक्रांतीच्या गडबडीत मला भूमिगत व्हावं लागलं होतं तेव्हाच तिची माझी भेट झाली बघ. मी आमच्या घरी वरकाम करणाऱ्या मारिआकडे गेलो होतो. मला काही दिवस भूमिगत राहणं आवश्यक होतं आणि मारिआकडे राहून ते सहजच शक्य होणार होतं. मी दाराशी गेलो अन् बेल वाजवली. मी त्या पोरीला ओळखलं नाही पण तिनं मला त्या घरात अनेक वेळा बघितलं होतं. मारिआ कुठं बाहेर गेली होती. त्यामुळे ही पोरगी घरात एकटीच होती.

'मारिआ इतक्यातच बाहेर गेलीय. पण तुम्ही बसाना! येईलच ती एवढयात!'

मला बसायला सांगून ती आत निघून गेली, मारिआची वाट पाहत मी बराच वेळ बसून राहिलो. साधारणतः रात्रीची वेळ असल्यामुळे बसल्या बसल्याच मला झोप लागली होती.

दार उघडलं गेलं आणि पुनः ती आत आली. माझ्याशी काहीसंसं बोलून ती खोलीतल्या खिडकीजवळ जाऊन बाहेर बघू लागली.

'किती छान दृश्य आहे बघाना!' खिडकीवरचा पडदा सरकविताना तिनं मला

उद्देशून म्हटलं...

मी तिच्याजवळ जाऊन बाहेर बघू लागलो. समोरच्या मोठ्या इमारतीतले सारे दिवे लागले होते. आणि काचांच्या खिडक्यातून त्यांचा प्रकाश रस्त्यावर येत होता. रस्त्यावर असलेल्या दिव्यांचा आणि हा प्रकाश याचं एक विचित्र पण सुखद वातावरण निर्माण झालं होतं. मला विशेष काहीच वाटलं नाही. तरीही मी म्हणालो, 'खरंच सुंदर दिसतंय...अन् अशा संध्याकाळच्या वेळी तर फारच सुंदर...!

आणि मग अभावितपणे झाल्यासारखा भासवून मी तिच्या खांद्यांना मुद्दामच स्पर्श केला पण ती अगदी तटस्थ उभी होती. माझ्या स्पर्शानं काहीही चलबिचल झालेली मला आढळली नाही. मी तिच्यापेक्षा उंच होतो. मग तिच्या मागे उभा राहून मी तिला आपल्या कवेत ओढलं... अन् थोडंसं उंच उचलत म्हणालो, 'आता हे दृश्य तुला आणखी चांगलं बघता येईल.'

" मग मी तिला हळूच खाली सोडून दिलं. पुन्हा मी तिला तसंच उचललं तेव्हा ती जराशी हसली... गुदगुल्या झाल्यासारखी... ती खरंच छान दिसत होती...'

गॅबोर बऱ्याच वेळपर्यंत चाललेली पीटरची ही बडबड ऐकत असतो. आश्चर्यचकित होऊन... मग तो एक इरसाल शिवी हसडतो • अन् पीटरला एक जोरदार कोपरखळी मारतो .. त्या धक्क्यानं पीटर खालीच पडायचा पण लगेच स्वत:ला सावरून तो आपली बैठक पुन्हा जमवतो.

'खड्डयात गेलं तुझं पुराण ! पण हे सगळं तू मला सांगतोयस ! मी काही त्यातला आहे असं तुला वाटतं की काय ?' गॅबोर खरं म्हणजे कंटाळला असतो.

'हे बघ ! जे घडलं ते मी तुला सांगितलं भैय्या !' पीटर आत्मविश्वासानं गॅबोरला सुनावतो, 'माझ्या सगळ्या आयुष्यानंच मला फसवलंय... अगदी नीचपणानं... तुला म्हणून सांगतो पण त्या पोरीचा विचार मनात आला की मलातर एखादा खून करावासा वाटतो !'

गॅबोर अजूनही त्याच्याकडे डोळे किलकिले करून बघत बसतो. मग एकदाचा जोरदार खाकरून तो जमिनीवर पचकन थुंकतो.

'बरं... ते जाऊ दे. मला जर तुझ्यासारखी बायको असती तर मी असली मूर्खपणाची बडबड केली नसती. तिच्यासारखी चांगली बायको तर शोधूनसुद्धा मिळणार नाही... देखणी... चांगल्या स्वभावाची... टापटिपीची... अशी पोरगी आहे ती खरं तर ! पण... तुझं तिच्याशी काही खटकलं वगैरे तर नाही ?'

'वेड लागलंय का तुला ?' पीटर रागातच म्हणतो. गॅबोरनं साऱ्या सोंगट्या एकत्र केलेल्या असतात.

'जाऊ दे नाहीतर... मला वाटलं आपण आपला खेळ थांबवलेला बरा !' पीटर त्या सगळ्या सोंगट्या आणि कागदाचा पट खिशात कोंबताना पुटपुटतो, 'या दिवसांत एखाद्या वेळी माणसाला वेड लागायचं अशानं !'

भिंतीवरून उतरून मग ती दोघंही रस्त्यानं रमतगमत चालायला लागतात कोपऱ्यावर एकमेकांचा निरोप घेतात. पीटर मागं वळूनही न बघता चालायला लागतो.

'...कदाचित गॅबोर माझा पाठलागसुद्धा करीत असेल...' मध्येच पीटरला वाटतं. तो भराभर पावलं उचलतो. नंतरच्याच वळणावर दुसऱ्या रस्त्यानं चालायला लागतो.

हळूहळू पण निश्चितपणे ती अस्वस्थता पीटरचा ताबा घेते. त्याच्या मनातला स्वतःच्या बायकोचा विचार आता कुठं तरी थांबतो. कदाचित गॅबोरला काही संशय आला असेल असं वाटून तो किंचित दचकतो. 'जर गॅबोरला काही संशय आला असेल तर आपला निकालच लागला म्हणायचा.' त्याच्या मनात येतं.

'इतकं मोठं महायुद्ध झालं पण मला कधी मृत्यूची भीती वाटली नाही. राज्यक्रांतीत सक्रिय भाग घेऊनही फासावर लटकावला गेलो नाही. पण आता मात्र मृत्यूची छाया मला भेडसावतेय!'

विचारातच दुकानासमोरच्या मोठाल्या काचांमध्ये दिसणारं स्वतःचं प्रतिबिंब तो नीट निरखून बघतो... एखाद्या परीक्षकासारखा...

'या वेळी जर कुणी मला कशासाठीही हटकलं...' त्याला वाटतं, 'तर मी त्याला त्या भयंकर रात्रीविषयी अगदी सारं सारं सांगून टाकीन' ...आणि कुणीतरी आताच आपल्याला हटकावं अशी पीटरला स्वतःशीच इच्छा होते.

तसं कुणी विचारलं तर त्याला सगळं काही खरं सांगून देण्यानं तो स्वतःच्या त्या भयानक विचारांपासून मुक्त होणार आहे असं त्याला वाटतं... पण तो सुटकेचा क्षण येईपर्यंत तरी सगळं व्यर्थच म्हणावं लागणार...!

एकाएकी कुठंतरी वाचलेला विनोद पीटरला आठवतो. पोलिसांच्या संशयी वृत्तीवर... प्रत्येक लहानसहान गोष्टींवर ते घेत असलेल्या संशयावर... आणि प्रत्येकाचा संशय घेऊन त्याला एका काल्पनिक जाळ्यात गुंफण्याच्या त्यांच्या वृत्तीवरला तो एक साधा विनोद असतो. त्या सोबत असलेल्या चित्रात एक माणूस खेळण्यातल्या एका लाकडी घोड्याला दोरी बांधून रस्त्यातून ओढत नेत असलेला आणि पोलिसांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्याकडे भयंकर संशयी नजरेनं बघताना दाखवलेले असते. तो लाकडी घोडा आणि तो माणूस ही दोघंही अतिशय संशयास्पद असल्यासारखी त्यांची दोघांवरही बारीक नजर असलेली चित्रात दाखवलेली असते.

त्या विनोदावर विचार करता करता पीटरच्या चेहऱ्यावर समाधानाचं हास्य पसरतं. त्याला वाटतं... 'आपण उगाच काळजीत पडलो. खरं म्हणजे अगदी मामुलीशी तर गोष्ट आहे...'

काहीतरी ठरल्यासारखा मग पीटर रस्त्यातून चालायला लागतो. एका खेळण्याच्या दुकानासमोर त्याचे पाय थांबतात. काहीएक विचार न करता तो दुकाना-

तल्या काऊंटरजवळ जाऊन उभा राहतो.

'माझ्या मुलासाठी मला एक लाकडी घोडा हवाय.'

दुकानदारानं आतल्या खोलीतून आणलेल्या माराभर रंगीबेरंगी लाकडी घोड्यांपैकी एक तो पसंत करतो.

'ठीक आहे. मला हा घोडा द्या. आणि त्याला ओढायला थोडीशी दोरीसुद्धा...!'

ते रंगीबेरंगी खेळणं काखेंत मारून पीटर दुकानाच्या बाहेर येतो. एका बाजूला उभा राहून त्या घोड्याच्या गळ्याभोवती ती घेतलेली दोरी तो नीट बांधतो. आणि त्याला जमिनीवर ठेवून एक पाऊल पुढे टाकतो. आपल्या छोट्या चाकांवर तो खेळण्यातला घोडा हळूहळू त्याच्या मागे फरफटत येतो. मग पीटर सावधानतेनं चालायला सुरुवात करतो. मधूनच मागे वळून त्या खेळण्याकडेही बघितल्याशिवाय त्याला राहवत नाही.

आता पूर्वीच्या भीतीचा लवलेशसुद्धा त्याच्या मनात शिल्लक राहत नाही. आता त्याला अगदी सुरक्षित वाटतं. अगदी सुरक्षित... पीटर एका सरळ रेषेत चालायला लागतो. त्याला डावीउजवीकडे बघावंसंसुद्धा वाटत नाही तरीही येणारे जाणारे लोक वळून त्याच्याचकडे बघत असल्याचं त्याला जाणवतं.

'मला वेड लागलंय असं त्यांना वाटत असावं.' पीटर मनाशीच पुटपुटतो... समाधानानं...' 'मग त्यांना कुणालाच खुनाची शंका येणार नाही. वेडा माणूस म्हणजे उपहासाची चीज असते झालं... पण परमेश्वरच त्यांचं अशा दुर्दैवी घटनांपासून संरक्षण करतो हेही खरंच नाही का' त्याला वाटतं...

शेजारच्या घरादारांच्या खिडक्यांतून, दारांतून, कुंपणांतून अनेक लोक... पोलिससुद्धा त्याच्याकडे बारीक डोळे करून बघत असलेले त्याला दिसतात... '...अगदी हवं तसंच सगळं घडतंय' पीटरला समाधान वाटतं.. घोंगावणाऱ्या माश्यांसारखे अनेक विचार मग त्याचा पिच्छा पुरवतात. पण आता पीटर सर्वांना पुरून उरतो.

ऊन आतां चांगलंच तापायला लागलेलं असतं. खडबडीत रस्त्यावरून आपल्या चार चाकांवर चालणाऱ्या घोड्याकडे अधूनमधून बघतानाच त्याची मान वळते. लहानपणी नदीच्या पात्रात उभ्या राहिलेल्या ज्या घोड्याच्या पाठीवर आपण थोपटत होतो तोच हा घोडा असावा असं त्याला वाटतं...

पण मधेच त्याला तो रस्ता आठवतो... ती लाल विटांची बसकी भिंत... त्या मागलं ते मोठं थोरलं घर... आणि एका लहानशा खोलीत मरून पडलेली ती तरुणी... त्याची बायको. तो दचकतो... त्या रस्त्याकडे बघण्याचासुद्धा त्याला धीर होत नाही.

'सगळं काही व्यवस्थित पार पडलं. पण तिथंच असलेल्या त्या मैनेला मात्र मारून टाकायचं आपण पार विसरलो' पीटरच्या मनात येतं, '...ती मैना त्या

पिंजऱ्याच्या उघड्या दारावर बसली होती. मग पंखांची फडफड करीत ती इकडे-तिकडे फिरू लागली... खोलीभर कदाचित तिला फिरताफिरता ती तरुणी दिसेल... आणि मग...'

अणि पीटरच्या मनातल्या या विचारांत मात्र खरोखरच तथ्य असतं.

पीटरनं आपल्या बायकोचा गळा आवळतेवेळी प्रत्येक आवाज आणि हालचालींची संवेदना असणारी ती मैना तिथंच असते... पिंजऱ्याच्या दारावर...

सकाळी ती मैना किलबिलाट करीत घरभर हिंडू लागते. आणि त्या मृत तरुणीच्या शेजारी फिरू लागते... मोठ्यानं किलबिलाट करू लागते... त्या तरुणीच्या प्रेताकडे पाहत... थोडा वेळ किलबिलाट सुरू राहतो तिचा... मग जेव्हा तरुणीकडून प्रतिसाद मिळत नाही तेव्हा ती मधेच शांत होऊन जाते...

पीटर अजूनही आपल्या मागे फरफटणाऱ्या घोड्याला घऊन रस्त्यांतून फिरतोय कधी तो दचकतो तर कधी शांतपणानं चालायला लागतो... अस्ताव्यस्त पसरलेल्या त्या प्रेताच्या पावलावरच ती सोन्यासारख्या पिवळ्या पिसांची मैना बसते... पुन्हा किलबिलाट सुरू करते... तिच्या आवाजाची पिवळी वर्तुळं निघतात... हळूहळू मोठी होतात... पीटर आपल्या लाकडी घोड्याला घेऊन अजूनही रस्त्यांतून फिरतोय... वर्तुळं... वर्तुळं... वर्तुळं... वर्तुळं... पिवळी... सोन्यासारखी चमकणारी... त्या आवाजांतून उठत असतात... विरत असतात... ○


आगामी प्रकाशन

## पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

अशक्य. पण टोमॅटो व इतर भाज्या तुम्ही स्वयंपाकघराच्या जवळपास मात्र वाढवू शकाल. घरामागच्या परड्यांत, व्हरांड्यांत, कुंड्यांत आणि गच्चीवरही तुम्ही भाजीपाला तयार करु शकाल. भाजीपाला तयार करणे सोपे असते. काही भाज्या तर अवघ्या दोन महिन्यांत तयार होतात.

# टोमॅटो स्वयंपाकघरात तयार होतात?

भाजीपाल्यांत जीवनसत्त्वे, प्रथीने, खनिजे, कार्बोहैड्रेट्स भरपूर प्रमाणात असतात. संतुलित आहारासाठी २८० ग्राम भाजीपाला खाणे आवश्यक असते. भारतात सरासरीने फक्त ७० ग्रामच भाजीपाला खाल्ला जातो.

कोणत्या ऋतूत कोणता भाजीपाला लावावा याची माहिती मोफत मिळण्यासाठी सोबतचे कुपन (इंग्रजीत) भरून ते खालील पत्त्यावर पाठवा: डायरेक्टर, पब्लिक रिलेशन्स, मिनिस्ट्री ऑफ फूड, ॲग्रिकल्चर, कम्युनिटी डेव्हेलपमेंट ॲण्ड कोऑपरेशन, ५३१, कृषी भवन, नवी दिल्ली-१.


Please mail me **FREE** LITERATURE on growing seasonal vegetables

NAME..........................................................
(in block letters)

..........................................................................

ADDRESS ..........................................................

..........................................................................





# कुटुंब नियोजन पुरवणी

## इस्लाम व कुटुंबनियोजन

‘ इस्लाम हा जगात सर्वांत अलीकडील महान धर्म. त्या धर्माने मनुष्याच्या आध्यात्मिक अंगावरच भर दिलेला नाही तर आमचे संबंध जीवनाशी व सभोवतालच्या लोकांशी कसे असावेत यासंबंधीही मार्गदर्शन केले आहे. मानवी स्वभावाशी विसंगत असे काहीही इस्लाम धर्मात नाही.

‘ आपल्या कृत्यांबद्दल माणूस पूर्णत: स्वतंत्र व जबाबदार आहे व त्याच्या ऐच्छिक कार्यक्षेत्रापर्यंत तो मुखत्यार आहे.

‘ कुटुंब नियोजन पद्धतीला कुराणात कुठेही आक्षेप घेण्यात आलेला नाही.

‘ सुन्नी पंथीयांचा विचार केला तर त्या पवित्र प्रेषकाने संतती नियमनास मुभा दिल्याचे खात्रीने दिसून येते.

‘ महंमद पैगंबराच्या काळात संतती नियमन प्रचलित होते हे दर्शविणारी विशिष्ट विधाने हादिथमध्ये आहेत. महंमद पैगंबरास हे माहिती होते. कुराण किंवा महंमद पैगंबरानेही त्याविरुद्ध विशिष्ट आक्षेप घेतलेला नाही.

‘ कुटुंब नियोजनाविरुद्धही मते व्यक्त केली जातात. तथापि हादिथवरील अधिकारी भाष्यकारही ही मते विश्वासार्ह मानीत नाहीत.

‘ अल्–गझली, इब्न–तैमिय्या आदी प्रमुख उलेमांचीही संतती नियमनास अनुकूल अशी स्पष्ट विधाने आहेत. या उलेमांनी संतती नियमनाच्या अनेक प्रकारांचा उल्लेख करून त्यास परवानगी दिली आहे.

‘ अगदी अलीकडेच म्हणजे १९३७ साली ईजिप्तच्या प्रमुख मुफ्तीला जेव्हा संतती प्रतिबंधक साधनांचा वापर करण्याबाबत मत विचारण्यात आले तेव्हा त्याने पुढील आशयाचा ‘ फतवा ’ प्रसिद्ध केला –

‘ प्रश्न : खालील बाबतीत आपले मत काय ?’

एका विवाहित गृहस्थास एक मूल आहे. त्याला अशी भीती वाटते की, जर त्यास आणखी पुष्कळ मुले झाली तर त्यांचे पोषण करणे त्याला कठीण जाईल आणि कष्ट

व काळजीमुळे त्याची प्रकृतीही बिघडेल. मुले लवकर लवकर झाल्यामुळे त्याच्या बायकोचीही प्रकृती खालावेल अशीही त्याला भीती वाटते. तर अशा परिस्थितीत त्याने किंवा त्याच्या बायकोने डॉक्टरांनी शिफारस केलेली साधने वापरावीत काय ? असे केले तरच वारंवार मुले होऊ शकणार नाहीत, दोन खेपांत अधिक काल जाईल, बायकोला स्वास्थ्य मिळेल व त्यालाही अवास्तव कष्ट करावे लागणार नाहीत.

...वरील प्रश्नाचा आम्ही विचार केला आहे आणि हनाफी कायदे तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या मतांच्या अनुषंगाने आम्ही जाहीर करतो, की या प्रश्नात नमूद करण्यात आलेल्या पद्धतीप्रमाणे संतती प्रतिबंधक उपाययोजना करण्यास आमची मुभा आहे. "

" अल्फाद "च्या कर्त्याने पतीला साधने वापरताना पत्नीची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही, असे मत व्यक्त केले आहे. पतीच्या परवानगीशिवाय बायकोनेही प्रतिबंधक साधने वापरण्यास हरकत नाही असेही अलीकडील विद्वानांनी प्रतिपादिले आहे. मात्र असे करताना सबळ कारणे त्यामागे असावीत असे त्यांना वाटते. "

" थोडक्यात म्हणजे नवऱ्यास किंवा बायकोस, परस्परांच्या संमतीने कुटुंब नियोजन करण्याची परवानगी आहे. ".....

[ पाकिस्तान सरकारच्या आरोग्य, मजूर व समाज कल्याण मंत्रालयाने १९६५–१९७० या तृतीय पंचवार्षिक योजनेच्या कालावधीसाठी तयार केलेली कुटुंब नियोजन योजना (पाने १४८ व १४९) यांवरून उद्धृत ]

## लाल त्रिकोण

कुटुंब नियोजनाच्या सोयी व सेवांची आपल्या देशात सर्वत्र चटकन् ओळख पटावी म्हणून एखादे बोधचिन्ह असण्याची गरज लक्षात घेऊन भारतीय कुटुंब नियोजन विभागांतील आमच्यापैकी काहींनी ऑक्टोबर १९६६ मध्ये विचार करण्यास सुरुवात केली. आमच्या जनसंपर्काच्या विविध प्रयत्नांत अशा चिन्हांमुळे कुटुंब नियमन पद्धतींचा वेगाने व विस्तृत प्रसार होण्यास मदतच होईल याची आम्हांला खात्री पटली.

त्यानंतरच्या तीन महिन्यांत सवडीनुसार आम्ही अनेक चिन्हांची पाहणी आणि पारख केली. त्यांपैकी एकाची अविकृतपणे निवड केली आणि त्यानुसार ' रेड ट्रँगल '–लाल त्रिकोणाच्या प्रसारास प्रारंभ झाला.

कुटुंब नियोजनाचे बोधचिन्ह म्हणून उलटा लाल त्रिकोणच का ?

कुटुंब नियमनाची गरज असलेल्या १० कोटी जोडप्यांच्या मनांची चटकन पकड घेईल असे एखादे बोधचिन्ह आम्ही एका नव्या कार्यक्रमासाठी शोधीत होतो. देशाच्या ५,६०,००० खेडयांतून आणि अनेक शहरांतून पसरलेल्या एकूण ५२ कोटी लोकसंख्येच्या एका प्रचंड उपखंडातील हा महत्त्वाचा गट आहे. अधिकृत अंदाजानुसार देशातील ७५ टक्के लोक निरक्षर असले तरी आमच्या शेकडो व हजारो खेडयांतून हे प्रमाण ९० टक्क्यांवरही जाईल. भिन्न भिन्न भाषा व भिन्न भिन्न चालीरीतींचा आमचा हा समाज रूढींनी जखडला गेला आहे. या गटांतील २० कोटी लोकांना माहिती व ज्ञान देऊन प्रवृत्त करण्याचा कठीण कार्यक्रम वाहतूक व दळणवळणाच्या तुटपुंज्या सोयीमुळे आणखीच अवघड झालेला आहे.

हे चिन्ह ठरविताना लोकांच्या मनात आधीच रुजलेल्या एखाद्या चिन्हाची त्यात सरमिसळ होऊ नये, तसेच ते चिन्ह पाहून कोणत्याही प्रकारचा तिटकारा त्यांच्या मनात निर्माण होणार नाही, याची आम्ही काळजी घेतली.

या चिन्हातून केवळ एक आणि एकमेव कुटुंब नियोजनाचा अर्थ प्रतीत व्हावा असे आमचे प्रयत्न होते. या चिन्हाशी जुळणारे दुसरे अत्यंत महत्त्वाचे चिन्ह लाल फुली–' रेडक्रॉस ' हे आहे. परंतु वस्तुतः रेडक्रॉसपेक्षाही ' रेड ट्रँगल'—लाल त्रिकोण-या चिन्हासच सर्वत्र अधिक मान्यता मिळण्याची शक्यता आहे. कारण काही बिगर ख्रिश्चन देशात रेडक्रॉस हे अभावसूचक चिन्ह मानले जात असल्यामुळे त्या चिन्हाची जागा दुसऱ्या चिन्हांनी घेतली आहे.

या चिन्हाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यात सुटसुटीतपणा असावा असा आमचा प्रयत्न होता. कल्पना तंतोतंत साकार करणाऱ्या चिन्हास जर विविध प्रकारचे साहित्य, अनेक रंग, रेखाटन करण्यासाठी केवळ चित्रकाराचीच आवश्यकता, भरपूर वेळ इत्यादी खटाटोप करावा लागला तर अशा चिन्हाचा भारत किंवा अन्य विकसनशील देशांत फारसा उपयोग होणार नाही, विशेषतः ग्रामीण, दुर्गम भागात, ज्या ठिकाणी या चिन्हांचा वापर आवश्यकच असतो तेथे तो करता येणार नाही. म्हणूनच आमच्या देशास सुटसुटीत वैशिष्टयपूर्ण चिन्हाची नितांत आवश्यकता होती.

रंगाविषयी मात्र आमच्यांत संमिश्र मते होती. निळा किंवा हिरवा आपुलकी व मैत्रीचा प्रतीक वाटला. परंतु अखेर धूसर वातावरणात व दूर अंतरावरून अधिक स्पष्ट दिसणारा लाल रंगच विजयी झाला. लाल रंग हा रक्त व युद्धाशी संबंधित आहे अशी शंका आमच्या काही सुशिक्षित सहकाऱ्यांनी व्यक्त केली परंतु आम्ही ती विचारात घेतली नाही. अशा भावनेतून कोणी भारतीय खेडूत कुटुंब नियोजनाबद्दल उदासीनता दाखवील किंवा त्यास नकार देईल असे आम्हांस मुळीच वाटले नाही. आमच्या देशातील बहुतेक भागात, वस्तुतः, लाल रंग हा शुभसूचक मानतात. हिंदू वधू विवाहदिनी लाल कुंकूमतिलक सौभाग्याचे प्रतीक म्हणून लावते.

लाल त्रिकोणाचे आमच्या मनात भरलेले आणखी एक वैशिष्टय असे की, त्याचे

कोणत्याही भारतीय भाषेत वर्णन करता येते आणि जवळजवळ अशीच परिस्थिती जगात सर्वत्र आहे. अतिशय महत्त्वाचे असे हे वैशिष्टय आहे. त्यामुळे कुटुंब नियोजनाची कल्पना उघड संभाषणातून चर्चिली जाण्यास मदत होते. (आमच्या कोणत्याही भाषेत ' कुटुंब नियोजन ' या शब्दाचा अर्थ संतती नियमन अथवा छोटे कुटुंब असा होत नाही,) चिन्हाच्या या वैशिष्टयामुळे विवाहितांनी दवाखाने व कुटुंब नियोजन साधनांच्या विक्री—वाटप केन्द्राकडे जाण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करणे सोपे जाते.

चिन्हासाठी आमचा शोध चालू असताना, लोकसंख्या मंडळाने जमविलेल्या व दाखविलेल्या डझनभर चिन्हांकडे आमचे लक्ष वेधण्यात आले. ही चिन्हे आकृतिदृष्टया खरोखरच आम्हांला आकर्षक वाटली. त्यांतील चार चिन्हांत कुटुंब नियोजनाची कल्पना प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न केलेला होता. पाच चिन्हांत मुले व मुलांच्या कल्याणाची कल्पना चित्राद्वारे सूचित करण्यात आली होती. ठरलेल्या तीन चिन्हांत, लाल त्रिकोणाप्रमाणेच कुठलीही कल्पना स्पष्ट होत नव्हती. परंतु या सर्व चिन्हांत सुटसुटीतपणा वैशिष्टयपूर्णता, सुबोधता व सहज रेखाटन या महत्त्वपूर्ण गरजांचा अभाव आम्हांस जाणवला.

भारतातील अनेक ठिकाणी आता लाल त्रिकोणाचे बोधचिन्ह पाहताना आमची निवड योग्यच होती, अशी आमची खात्री पटली आहे आणि हे चिन्ह जगात सर्वत्र कुटुंब नियोजनाचे बोधचिन्ह म्हणून मान्यता पावेल यांतही आम्हांस तिळमात्र शंका वाटत नाही.

**—दीपक भाटिया**

**[ कुटुंब नियोजन विभागाचे कमिशनर ]**

# आकड्यांची जादू

मोठा मासा लहान माशाला गट्ट करतो. माशांची वाढती संख्याच त्यांचे पोषण करीत असते. अशा प्रकारे त्यांच्या गरजा व साधनसामग्री यांचा मेळ साधला जातो. परंतु माशांच्या बाबतींत जे खरे आहे ते मात्र या भूतलावरील—पृथ्वीवरील-४,००,०.०,००.००० मानवांबाबत खरे नाही.

आज दिसणाऱ्या या प्रचंड लोकसंख्येची वाढ लाखो वर्षांपासून होत आहे. मानवजातीच्या जन्मानंतरच्या पहिल्या दहा लाख वर्षांत जगाची लोकसंख्या १,००,०,००.००० झाली. त्यानंतरच्या १०० वर्षात तिने २,००,०.०,००,००० लोकसंख्येचा आकडा ओलांडला. परंतु गेल्या ३२ वर्षांत म्हणजे १९६७ पर्यंत या

लोकसंख्येत १,००,००,००,००० ची भर पडली आहे. दुष्काळ, युद्धे, रोगराई यांनाही न जुमानता ही वाढ झाली. या लोकसंख्या वाढीच्या आकड्यांत भर टाकणारा प्रत्येक आकडा पुढील वाढ भूमिती श्रेणीने करवितो. ही त्या आकड्यांची जादू आहे.

सन १९०१ मध्ये भारताची लोकसंख्या फक्त २३,८३,००,००० होती. तथापि १९२१ पर्यंत तिची मजल २५,१,२,००,००० पर्यन्त पोहोचली. त्या नंतरच्या दोन दशकांत म्हणजे १९४१ पर्यंत तीत आणखी ६,७३,००,००० ची भर पडली. सन १९६१ पर्यन्त लोकसंख्या ४३,९०,००,००० पर्यन्त गेली म्हणजे १९४१ ते १९६१ या वीस वर्षांत १,२.०,४०,००० ने या लोकसंख्येत वाढ झाली. परंतु १९६६ ला संपलेल्या पाच वर्षांतील आणखी ६,१०,००,००० व्यक्तींची भर पडली.

आपल्या देशात प्रत्येक वर्षात २,०,०,००, ००० मुले जन्मास येतात. तथापि, वृद्धत्व, साथीचे रोग, कायम स्वरूपाचे रोग, अपघात यांमुळे विविध वयोमानातील जवळजवळ ८०,००,००० व्यक्ती मरतात. म्हणजे आमच्या ५,६०,००० खेड्यांतून व लहानमोठ्या शहरांतून पसरलेल्या या लोकसंख्येत दरवर्षाला १,२०,००,००० भर पडते. म्हणज लोकसंख्या वाढीचे प्रमाण शेकडा २.४ टक्के पडते. या उलट मृत्यूचे प्रमाण दिवसेंदिवस घटतच आहे. सन १९५१ मध्ये मृत्यूचे प्रमाण दर हजारी ३९ होते. परंतु तेच आता घटून दर हजारी १६ झाले आहे. पश्चिम युरोपात १९ व्या शतकात आर्थिक सुबत्तेमुळ मृत्यू प्रमाणात घट दिसून आली होतो. परंतु आपल्या देशातील त्या नाटयमय घटीचे कारण तसे नाही, तर प्रगत वैद्यकीय तंत्र, लस, रोगप्रतिबंधके व अन्य गुणकारी आश्चर्यकारक औषधांचा वापर हे आहे. सन १९५१ मध्ये संभाव्य आयुर्मर्यादेचे प्रमाण फक्त २७ वर्षे हे होते. ते आता ५० पर्यन्त गेले आहे. जर आमची लोकसंख्या आजच्याच वेगाने वाढत राहिली तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या पाहणी निष्कर्षानुसार ती सन २००० साली ९६,६०,००,००० झाल्याशिवाय राहणार नाही. जन्माचे प्रमाण हळूहळू कमी झाले तरी लोकसंख्या त्या वेळी ९१,००००,००० होईल, तर जन्माचे प्रमाण वेगाने कमी झाले तरी ती ६६,६०,००,००० च्या घरात जाईल. आमच्या देशातील ५०,००,००,००० लोकसंख्येचे पोषणही आम्हांस करता येण्यासारखे नाही. गेल्या १६ वर्षांत धान्योत्पादन १८ दक्षलक्ष टनांनी वाढले ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर, येत्या ३२ वर्षांत आमच्या लोकसंख्या वाढीचा वेग काहीही राहिला तरी आम्ही त्या लोकसंख्येचे पोषण करू शकू असे म्हणता येणार नाही.

वाढत्या लोकसंख्येचे पोषण आम्हांस करता आले पाहिजे हे खरे. उपलब्ध साधनसामग्रीद्वारा उत्तम प्रकारे व सुकरतेने पोषण करता यावे या दृष्टीने पाहता आपली लोकसंख्या क्रमशः बेताने ठेवणे हाच व्यवहारी मार्ग होय. आपली लोकसंख्या सतत वाढते आहे हे एक सत्य आहे. मात्र धान्योत्पादन वाढीचा संभव

निश्चित स्वरूपात मांडता येत नाही. उपासमारीचा विचार केला की, या लोकसंख्या वाढीचे समर्थन करताच येत नाही. आर्थिक वस्तुस्थितीकडे आम्ही डोळेझाक करू शकत नाही किंवा आमची धान्य परिस्थिती लोकसंख्येच्या प्रमाणात सुधारेल अशी अपेक्षाही करू शकत नाही. कारण तो वेळपर्यन्त शेती-प्रगत तंत्रांचा अवलंब करून पदरात जे फळ पडेल त्यापेक्षा लोकसंख्या वाढीचे प्रमाण अधिकच राहील. लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा अधिक वेगाने धान्योत्पादन करता येत नाही तोपर्यंत लोकसंख्या आटोक्यात ठेवणे श्रेयस्कर होय.

जर आमचे ध्येय वस्तुनिष्ठ राहू शकत नसेल तर वस्तुनिष्ठता हे आमचे ध्येय मानायला हवे. आज माणसाची ग्रहणशीलता, बुद्धी, धडाडीच्या आटोक्याबाहेर असे काहीही नाही. म्हणूनच मृत्यूचे प्रमाण जसे कमी करण्यात आले तसेच जननाचे प्रमाणही कमी करणे त्याच्या करामतीने शक्य आहे. त्यासाठी साधने व पद्धतीही उपलब्ध आहेत व त्याद्वारे प्रत्येकजण आपणांला केव्हा आणि किती मुले हवीत हे ठरवू शकतो. संतती प्रतिबंधक शस्त्रक्रियेपासून गोळचा व लूपपर्यंत अनेक प्रकारच्या कुटुंब नियोजन पद्धती आज उपलब्ध आहेत. आमच्या देशांतील १८ कोटी विवाहितांना या पद्धतींचा वापर करण्याची मुभा आहे.

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाले तर ही ९० कोटी जोडपी स्वतःच्या–तसेच देशाच्या–स्थिरतेसाठी व प्रगतीसाठी दोन किंवा तीन मुलांपर्यंतच मुले होऊ देऊन आपले कुटुंब सुटसुटीत ठेवण्याचा निर्णय घेऊ शकतात. यांपैकी केवळ ५० टक्के जोडप्यांनी कुटुंब नियोजनाबाबत योग्य ती दक्षता घेतल्यास दहा वर्षांच्या कालावधीत जननाचे प्रमाण निम्म्यावर म्हणजे दर हजारी २१ वर येईल.

आम्ही या आव्हानाला तोंड देऊ शकलो नाही तर आमच्यावर खडतर परिस्थिती ओढवेल. मग, आता वेळ गेली असेच म्हणण्याची पाळी आमच्यावर येईल.

फ्रेंच लोकांना जेव्हा खाण्यासाठी ब्रेड मिळत नव्हता तेव्हा ब्रेडऐवजी केक खा, असा आदेश मेरी अँटोनिटीने केला होता. फ्रेंच लोक कोणत्या परिस्थितीला तोंड देत होते याची तिला यत्किंचितही कल्पना नव्हती हेच वरील विधानावरून दिसून येते. परंतु आपल्या गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणूनच निरनिराळ्या देशांतील लोक राज्यकर्त्यांना निवडून देतात. आजच्या लोकांची गरज छोटे कुटुंब ही आहे. या गरजेच्या पूर्तीसाठी मदत करण्यास सरकार सिद्ध आहे. मेरी अँटोनिटीसारखा सल्ला ते देऊ शकत नाही. तेव्हा कुटुंब नियोजनपद्धतींचा वापर केला तर केवळ भाकरीच नव्हे तर पोळीदेखील हमखास मिळेल असे ते सांगते. आमच्या समाजाने छोट्या कुटुंबाचा अवलंब करणे हाच लोकसंख्या वाढीच्या समस्येवरील उपाय आहे.

**–के. बी. माथूर**

▽ ▽ ▽ **समाप्त** ▽ ▽ ▽

# १९



# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

पेट्रोग्राडमध्ये क्रांतीच्या वादळी वाऱ्यांनी थैमान मांडले होते. संतप्त कामगारांचा आणि बंडखोर सैनिकांचा उत्साह चारी दिशांनी ओसंडू लागला होता. ठिकठिकाणी जुन्या राजवटीविरुद्ध निदर्शने होत होती. एक एक सैन्यविभाग कामगारांच्या आवाहनाला साद देऊन झारशाहीविरुद्ध उभे राहण्याची प्रतिज्ञा घेत होता. कामगारांच्या, विद्यार्थ्यांच्या आणि सैनिकांच्या या उठावात स्त्रियाही सहभागी झाल्या होत्या. जनशक्तीचे हे विराट स्वरूप पाहून कामगार नेते अक्षरश: भांबावून गेले. लोकांचा उठाव एवढ्या थोड्या वेळात इतके प्रक्षुब्ध स्वरूप धारण करील याची त्यांनाही कल्पना नव्हती. या अस्थिर आणि अज्ञात परिस्थितीला नीट वळण देण्याची अवघड कामगिरी त्यांच्यावर येऊन पडली होती. सत्ता हाती येण्याचा संभव निर्माण होताच मूळचे अंतर्गत मतभेद अधिकच उफाळून वर येत होते. झारशाहीच्या हातातून निसटणारी सत्ता अखेर कोणाच्या हाती येणार याचा कोणालाच अंदाज येत नव्हता. प्रत्येक गट या ऐतिहासिक कालखंडात आपण कसे प्रभावी ठरू या प्रयत्नात चूर होऊन गेला होता. पेट्रोग्राडमध्ये काय घडते याकडे साऱ्या देशाचे लक्ष लागलेले होते. १२ मार्च १९१७ या दिवसांपासून पेट्रोग्राडने नवे रूप धारण केले होते.

अॅलेक्झांडर केरेन्स्की याने ड्युमाभोवती जमलेल्या निदर्शकांचे ' क्रांतीचे अग्रदूत ' म्हणून स्वागत कल्यानंतर पेट्रोग्राडमधील कामगारप्रतिनिधींनी प्रातिनिधिक मंडळाची (सोव्हिएट ऑफ वर्कर्स डेप्युटीज)

स्थापना करण्याचे ठरविले. दुपारी दोन वाजता टॉरिड प्रासादाच्या आवारात या प्रतिनिधींची बैठक होऊन सोव्हिएटची हंगामी कार्यकारिणी निवडण्यात आली. पेट्रोग्राडचा सारा कारभार आता या सोव्हिएटमार्फत चालणार होता. ड्युमामधील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा नेता श्वेईड्झ याची सोव्हिएटच्या अध्यक्षपदी व केरेन्स्कीची उपाध्यक्षपदी निवड झाली. एकीकडे ही बैठक चालू असताना बंडखोर सैनिकांनी तुरुंग फोडून राजबंद्यांची सुटका केली. या बंडखोर सैनिकांच्या उदरनिर्वाहाची सोय करणे हे सोव्हिएटचे पहिले काम होते. त्यासाठी टॉरिड प्रासादात सोव्हिएटच्या क्रांतिसेनेची कचेरी स्थापन करण्यात आली. सोव्हिएटची स्थापना झाल्याची बातमी कळताच या सोव्हिएटमध्ये आपल्यालाही प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे यासाठी निरनिराळ्या कामगार–संघटनांचे प्रतिनिधी टॉरिड प्रासादाकडे येऊ लागले. रात्री नऊ वाजता अडीचशे कामगार-प्रतिनिधींची बैठक होऊन तीत सोव्हिएटचे अध्यक्षीय मंडळ निवडण्यात आले. दुसऱ्या दिवसापासून हे अध्यक्षीय मंडळ सोव्हिएटच्या वतीने कामगार क्रांतीचे नेतृत्व करणार होते.

पेट्रोग्राड लोकक्षोभाच्या ज्वालांनी वेढले गेले असताना झार निकोलस मात्र मोहिलेव्ह येथील आपल्या शाही आगगाडीत विश्रांती घेत होता.

कोणी तरी येऊन पेट्रोग्राडमधील उठावाची बातमी सांगताच झारने परिस्थितीचा तपशील जाणून घेण्याऐवजी जनरल इव्हानोव्ह याला या उठावाचा लष्कराच्या मदतीने बीमोड करण्याचा हुकूम दिला. १३ मार्चच्या रात्री इव्हानोव्ह राजनिष्ठ सैनिकांची तुकडी घेऊन मोहिलेव्हहून पेट्रोग्राडकडे येण्यासाठी निघाला. झारनेही आपल्या शाही आगगाडीतून पेट्रोग्राडजवळच्या सारस्कोये–सेलोकडे कूच करण्याचे ठरविले. झारशाहीचा अंत आता जवळ आला आहे याची खुद्द झारला कल्पना नसली तरी कॅप्टन निलोव्हसारख्या त्याच्या मित्रांना कल्पना आली होती. तो म्हणाला,–' लवकरच पेट्रोग्राडमधल्या दिव्यांच्या खांबांना आपली प्रेते लटकलेली लोकांना पहावयास मिळतील. जगात यापूर्वी कोठेही झाली नसेल अशी भीषण क्रांती येथे होणार आहे. '

शाही आगगाडी मधल्या एका स्टेशनवर थांबताच तेथील राजनिष्ठ सैनिकांनी मोठ्या थाटाने मानवंदना दिली. ते पाहून मोर्डिनोव्ह हा झारचा शरीरसंरक्षक सुखावला. जवळच उभ्या असलेल्या जनरल नादिश्किन याला तो म्हणाला, ' अजूनही सैनिक आपल्या बाजूचे असल्यामुळे झारचे नेतृत्व कायम राहील असे मला वाटते. '

' कोणी सांगावे, कदाचित ही शेवटचीच मानवंदना ठरेल ' – नादिश्किन म्हणाला.

रात्री दोन वाजता शाही गाडी मलयविशेरा स्टेशनवर येऊन पोचली. झार शांतपणे झोपी गेलेला होता. मोर्डिनोव्ह व नादिश्किन प्लॅटफॉर्मवर उतरले. एवढ्यात प्लॅटफॉर्मवरचा लष्करी अधिकारी त्यांच्याजवळ येऊन बारीक आवाजांत म्हणाला,–

' झार कुठाय ? '

' तो झोपलाय ! ' नादिश्किनने सांगितले.

' झोपलाय ? म्हणजे आमची तार तुम्हांला मिळालेली दिसत नाही. पेट्रोग्राडमध्ये हंगामी सरकार स्थापन झाले असल्यामुळे शाही आगगाडी सारस्कोये-सेलोकडे नेण्याऐवजी ती स्कोव्हकडे न्यावी, असा पेट्रोग्राडच्या आपल्या कचेरीचा निरोप आहे. '

मलयविशेराहून शाही गाडी स्कोव्हकडे जाऊ लागली. उत्तर आघाडीचा सेनानी जनरल रझस्की याची मुख्य कचेरी स्कोव्ह येथे असल्यामुळे पेट्रोग्राडमधील उठाव मोडण्यासाठी त्याची मदत घेण्यासाठी गाडीच्या प्रवासाची दिशा बदलण्यात आली होती.

झार मोहिलेव्ह येथे असताना अलेक्झांड्रा मात्र सारस्कोये-सेलो सोडावयाला तयार नव्हती. आपल्या आजारी मुलांची शुश्रूषा करीत ती पेट्रोग्राड्मधील परिस्थितीचा अंदाज घेत होती. परंतु क्षणाक्षणास पेट्रोग्राडमधील उठाव वाढत चालल्याच्या बातम्या कानांवर येऊ लागल्या तशी ती हताश झाली. तिने लागलीच झारला पत्र लिहिले– ' परिस्थिती पार बिघडून गेली आहे. परंतु या बिघडलेल्या परिस्थितीवरही आपण मात करू शकू अशी माझी दृढ श्रद्धा आहे. तुम्ही आता नेमके कोठे आहात हे मला माहीत नाही. आपण दोघे केव्हा भेटणार आहोत हेही सांगता येत नाही. तुमच्याकडून प्रातिनिधिक सरकारबाबतच्या जाहीरनाम्याला मंजुरी घेण्याचा रोडॅझिॲन्को प्रभृतींचा प्रयत्न सुरू असल्याचे मला कळले आहे. सम्राटास अशा रीतीने कोंडीत पकडण्याचा डाव यापूर्वी कधीच कोणी खेळले नसेल. कदाचित तुम्हांस जाहीरनाम्यावर स्वाक्षरी करावी लागेल. परंतु तो जाहीरनामा आपण बंधनकारक मानण्याचे काहीही कारण नाही. कारण धाकदपटशा दाखवून घेतलेला होकार योग्य वेळ येताच उधळून लावणे समर्थनीय ठरते.'

ॲलेक्झाड्रांचे हे पत्र झारच्या हाती पडले नाही. परंतु ते मिळाले असते तरी त्यातील सल्ल्याचा आता काही उपयोग होणार नव्हता. शाही गाडी स्कोव्हला पोचताच जनरल रझस्की झारला भेटावयास आला. ' आपल्याला हंगामी सरकारचा बीमोड करायचा आहे ' असे झारने सांगताच रझस्की म्हणाला, ' हंगामी सरकारला मान्यता दिल्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही, अशी परिस्थिती आहे.'

झार रझस्कीशी तासभर वाद घालत होता. परंतु शेवटी ' रोडॅझिॲन्कोच्या नेतृत्वाखाली प्रातिनिधिक सरकार बनविण्यास आपण तयार आहोत,' अशी त्यास कबुली द्यावी लागली. त्यानंतर रझस्कीच्या सूचनेनुसार झारने जनरल इव्हानोव्ह यास तार केली, ' मी पेट्रोग्राडला पोचेपर्यंत कोणतीही उपाययोजना करू नकोस. '

पहाटे साडेतीन वाजता रझस्कीने रोडॅझिॲन्को यास तार करून प्रातिनिधिक सरकारची ड्युमाची मागणी मान्य करण्यास झार तयार असल्याचे कळविले. ती तार पाहताच रोडॅझिॲन्को भडकला. तो म्हणाला, " गेले आठ-दहा दिवस मी हेच

याला सारखे सांगत होतो. परंतु तेव्हा याला जाग आली नाही. आता प्रातिनिधिक सरकारची मागणी मान्य करून काही उपयोग नाही. कारण लोक आता झारने राज्यत्याग केला पाहिजे, अशी मागणी करू लागले आहेत.'

सकाळी सव्वादहा वाजता रझस्की परत झारला भेटावयास गेला. आपली तार वाचताच रोडॅझिअॅन्को खूष झाला असेल अशी झारची कल्पना होती. परंतु रोडॅझिअॅन्को याच्याशी नुकतेच टेलिफोनवरून जे बोलणे झाले होते त्याचा तपशील जेव्हा रझस्कीने सांगितला तेव्हा झारच्या चेहऱ्यावर चिंतेची पहिली छटा उमटली. खुर्चीतून उठून तो रस्त्याच्या खिडकीपाशी गेला. क्षणमात्र तेथे शांतता पसरली. चार–पाच मिनिटांतच झार पुन्हा खुर्चीवर येऊन बसला. कातर आवाजात तो रझस्कीस सांगू लागला, "मी राज्यत्याग करण्याने रशियाचे हित साधले जाणार असेल तर माझी त्यालाही तयारी आहे. परंतु मी राज्य सोडून पळालो तर लोकांचा अधिकच गैरसमज होईल, असे मला वाटते. शिवाय माझे सैनिक काय म्हणतील ? आपल्यास लोकांच्या तोंडी सोपवून याने मात्र पळ काढला अशीच शापवाणी ते उच्चारतील. रझस्की, खरेच दुःख भोगण्यासाठीच माझा जन्म झाला असावा. मी माझ्या देशासदेखील दुःखाशिवाय काय दिलं आहे! राज्यारोहणाच्या दिवशी मी लोकांच्या सेवेची प्रतिज्ञा घेतली होती. पण ती प्रतिज्ञा मला पाळता आली नाही आणि म्हणून राज्यत्यागाची शिक्षा मला भोगलीच पाहिजे.'

झार आपल्या अंधाऱ्या भवितव्याचा वेध घेण्याचा अर्थशून्य प्रयत्न करीत असतानाच सरसेनानी अॅलेक्सेयेव्ह याची तार येऊन पडली होती. त्या तारेत सरसेनानीने म्हटले होते– 'झार निकोलस याने राज्यत्याग करून आपल्या जागी आपल्या मुलाची नेमणूक केली तरच आपण लढू, असे जर्मन आघाडीवर उभ्या असलेल्या लष्कराने मला कळविले आहे. सैनिकांची ही मागणी मान्य होण्यास जेवढा उशीर होईल तेवढा क्रांतिकारकांचा जोर वाढत जाणार आहे. आता सैनिकही काही करू शकत नाहीत. कारण सर्व रस्ते आणि लोहमार्ग क्रांतिकारकांनी रोखून धरले असून सैन्याचा रसदपुरवठाही त्यांच्या ताब्यात गेला आहे.'

रझस्कीने अॅलेक्सेयेव्हची तार झारला वाचून दाखविली.

'मी आता काय काय करावे अशी तुझी अपेक्षा आहे ?' झारने विचारले.

रझस्की म्हणाला, 'हा प्रश्न इतका गंभीर आहे की त्याचे तडकाफडकी उत्तर देता येणार नाही. मला वाटते, इतर आघाड्यांवरील सेनानींचे मत घेऊन आपण याबाबत निर्णय करावा.'

दुपारी दोन वाजता रझस्की पुन्हा झारची भेट घेण्यासाठी शाही आगगाडीत आला. या वेळी त्याच्याबरोबर आणखी दोन सेनानी होते. झारने भोवतालच्या सेवकांना बाहेर जाण्यास सांगितले. तिघे सेनानी स्थानापन्न झाल्यानंतर त्याने डब्याचा दरवाजा बंद करून घेतला. झार इतका अस्वस्थ होता की तो सिगारेटी-

वर सिगरेट पेटवीत होता.

'पेट्रोग्राडमधील ताजी बातमी काय आहे?' झारने विचारले. रझस्की सांगू लागला, 'राजवाड्यातील पहारेकरीदेखील ड्युमास सामील झाले आहेत. ग्रँड ड्यूक सिरील हाही आपल्या सैनिकांना घेऊन ड्युमाला मिळाला आहे. मॉस्कोचा लष्करी गव्हर्नरही हंगामी सरकारच्या आदेशानुसार वागू लागला आहे. हंगामी सरकारने आपल्या सर्व मंत्र्यांना अटक केली आहे. रोडँझिअँन्कोची भेट घेण्यास अॅलेक्झांड्रा तयार झालेली आहे.'

रझस्की ताज्या परिस्थितीचा अहवाल सांगत असताना सर्व आघाड्यांवरील सेनानींच्या तारा आल्या होत्या. झार निकोलस याने राज्यत्याग करावा असेच आपले मत असल्याचे सर्व सेनानींनी कळविले होते. त्या तारा रझस्कीने वाचून दाखविल्यानंतर सुस्कारा टाकीत झार म्हणाला, 'सेनानींचं म्हणणं मला कळलं. पण साऱ्या देशाचीदेखील अशीच इच्छा आहे का हे जाणून घ्यायला नको का?'

रझस्की म्हणाला, 'महाराज, साऱ्या जनतेचं मत जाणून घेण्याइतकी सवड आता उरलेली नाही. उलट जसजसा वेळ जात आहे तसतशी परिस्थिती आणखी बिघडत चालली आहे.'

पुन: डब्यात शांतता पसरली. रझस्की आणि त्याचे दोन सहकारी झारच्या बदलत्या चेहऱ्याकडे निरखून पाहत होते. हळूहळू झारला परिस्थितीची जाणीव होत होती. मनाशी निर्णय होताच तो म्हणाला, 'रझस्की, मी राज्यत्याग करावयास तयार आहे.'

एवढे बोलून झारने रोडँझिअँन्कोला धाडावयाच्या तारेचा मजकूर सांगण्यास प्रारंभ केला– 'रशियाच्या कल्याणासाठी कोणताही त्याग करण्यास मी नेहमीच तयार असतो आणि याच भावनेने मी आता राज्यत्यागाचा निर्णय करीत आहे. माझ्या जागी माझ्या मुलाची नेमणूक करून तो सज्ञान होईपर्यंत त्याचा पालक म्हणून माझा भाऊ मिखाईल याने राज्यकारभार पाहावा, अशी मी व्यवस्था करीत आहे. मात्र माझा मुलगा सज्ञान होईपर्यंत त्याला माझ्याजवळ ठेवून घेण्याचा माझा विचार आहे.'

दुसरी तार जनरल अॅलेक्सेयेव्ह यास करण्यात आली– 'रशियाच्या भल्यासाठी मी राज्यत्याग करणार असून माझ्या जागी मुलाची नेमणूक होईल. सर्व प्रजाजनांनी त्याच्याशी निष्ठावंत राहावे.'

झारची तार रोडँझिअँन्कोला मिळताच, राज्यत्यागाच्या घोषणापत्रकावर त्याची स्वाक्षरी घेण्यासाठी गुचकोव्ह व शुलगेन हे ड्युमा-सदस्य १५ मार्चला सकाळी पाच वाजता स्कोव्हकडे जाण्यास निघाले. शुलगिन लिहितो– 'स्कोव्हला पोचावयास आम्हांला रात्रीचे दहा वाजले. रूळ तुडवीत आम्ही स्टेशनापासून काही अंतरावर उभ्या असलेल्या शाही गाडीपाशी पोचलो. आम्ही झारच्या बैठकीच्या

डब्यामध्ये जाऊन बसल्यानंतर थोड्या वेळाने तो तेथे आला. आम्ही त्यास उठून अभिवादन केले. त्याने हातानेच बसण्याची खूण केली. पेट्रोग्राडमधील परिस्थितीसंबंधी गुचकोव्ह सविस्तर माहिती सांगत होता. त्याचे निवेदन झार शांतपणे ऐकत होता. गुचकोव्हचे निवेदन पुरे होताच झार म्हणाला, 'मी राज्यत्याग करण्याचे ठरविले असल्याचे तुम्हांला माहीत आहेच. माझ्या जागी माझा मुलगा अॅलेक्सी याची राज्यपदावर नेमणूक करण्याचा माझा विचार होता. परंतु आता मी तो विचार बदलला असून माझा भाऊ मिखाईल याला राज्यपद देण्याचे मी ठरविले आहे.' आम्हांला हा बदल सर्वस्वी अनपेक्षित होता. परंतु तरीही आम्ही विरोध केला नाही.' गुचकोव्हने राज्यत्यागाच्या घोषणेचा कागद झारच्या हाती दिला. तो घेऊन झार आपल्या खोलीत गेला. थोड्याच वेळात तो परत आला आणि तो कागद गुचकोव्हला परत दिला. झारने आपल्या खाजगी खोलीतच त्यावर स्वाक्षरी केली होती. आमचे काम आता संपलेले असल्यामुळे आम्ही उठलो. रात्रीचे ११–४० झाले होते झारचा निरोप घेऊन आम्ही प्लॅटफॉर्मवर आलो व दुसऱ्या दिवशी सकाळी पेट्रोग्राडला परतलो.

गुचकोव्ह आणि शुलगिन स्कोव्हला गेलेले असतानाच ड्युमा मंडळाने आणि पेट्रोग्राड सोव्हिएटने रशियाच्या नव्या राजवटीची घोषणा केली होती. या नव्या हंगामी सरकारचे नेतृत्व प्रिन्स जॉर्ज ल्वोव्ह याच्याकडे देण्यात आले होते. याशिवाय मिलिउकोव्ह (परराष्ट्रमंत्री), गुचकोव्ह (युद्धमंत्री), केरेन्स्की (न्यायमंत्री) प्रभृतींचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आलेला होता. या मंत्रिमंडळात लिबरल पक्षाचेच बहुमत होते. नवे सरकार स्थापन होताच पेट्रोग्राड सोव्हिएटने केवळ निकोलस झार यालाच आपला विरोध आहे, असे जाहीर केले.

१५ मार्च या दिवसाने रशियाच्या भवितव्याच्या दृष्टीने बराच मोठा पल्ला गाठला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता केरेन्स्कीने ग्रँड ड्यूक मिखाईल याला फोन करून ड्युमाचे काही सदस्य आपल्याला भेटावयास येत असल्याचे त्याला कळविले. त्याप्रमाणे ग्रँड ड्यूकच्या निवासस्थानी प्रमुख ड्युमा सदस्य जमा झाले. रोडॅझिॲन्को म्हणाला, 'आतापर्यंत आमचा केवळ झार निकोलस यालाच विरोध होता. परंतु आता रशियात राजेशाहीच राहता कामा नये असे एकंदर जनमत आहे.' इतर सदस्यांनीही रोडॅझिॲन्कोच्या सूचनेचा पाठपुरावा केला. एकटा मिलिउकोव्ह मात्र म्हणाला, 'मला ही सूचना मान्य नाही. नामधारी सरकारप्रमुख म्हणून का होईना पण राजा हवाच. त्याशिवाय आपल्या नव्या राजवटीस स्थैर्य प्राप्त होणार नाही. राजेशाही नष्ट केली तर शेवटी लोकक्षोभाच्या सागरात हंगामी सरकारची नौकाही बुडून जाईल आणि तसे झाले तर घटना समिती बोलावून नवी राज्ययंत्रणा निर्माण होण्यापूर्वीच देशात अराजकाचा वणवा भडकेल.

सध्याच्या स्फोटक परिस्थितीला तोंड देण्याची एकटया हंगामी सरकारमध्ये मुळीच ताकद नाही. राजेशाहीची मदत आम्हांला घेतलीच पाहिजे.'

परंतु केरेन्स्कीने मिलिउकोव्हचे म्हणणे खोडून काढले. तो म्हणाला, 'ग्रँड ड्यूकने सध्याच्या अशांत परिस्थितीत राज्यपद स्वीकारले तर त्याच्या स्वतःच्या जिवास तर धोका आहेच; शिवाय देशात दोन गट पडून ठिकठिकाणी यादवी युद्ध सुरू होईल. सारा रशिया रक्ताने न्हाऊन जाईल.'

केरेन्स्कीच्या या बोलण्याचा ग्रँड ड्यूकवर परिणाम झाला. स्वतःच्या जिवाचा धोका पत्करून राज्यस्वीकार करण्याची त्याची तयारी नव्हती. त्यामुळे मिलिउकोव्हच्या आग्रहाला न जुमानता ग्रँड ड्यूक म्हणाला, 'माझा निर्णय झालेला आहे. राज्यपद स्वीकारण्यास मी तयार नाही.'

पेट्रोग्राडमधील परिस्थिती इतकी विकोपाला गेली असतानाही झार निकोलस पुन्हा राज्यपदावर आरूढ होईल, अशी भाबडी आशा अलेक्झांड्राच्या मनात तरळत होती. १६ मार्चला आपल्या पतीला लिहिलेल्या पत्रात ती म्हणते, 'राज्यत्याग करण्याची घोषणा तुम्हांला का करावी लागली हे मला माहीत आहे. आपण दोघे परस्परांना इतके चांगले जाणतो की प्रत्यक्ष बोलल्याशिवायही आपण एकमेकांचे मनोगत जाणून घेऊ शकतो. तुम्ही पुन्हा रशियाच्या राज्यपदावर आरूढ झालेले मला पाहावयास मिळेल, अशी माझी मनोदेवता मला सारखी ग्वाही देत आहे. एक दिवस स्वतः परमेश्वर पृथ्वीवर येऊन आपल्या हातांनी तुमच्या मस्तकावर राजमुकुट चढवील.'

पेट्रोग्राडमधील सोव्हिएटला आता अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. सोव्हिएटच्या आठ कलमी जाहीरनाम्याला हंगामी सरकारने मंजुरी दिल्यानंतर सोव्हिएटने हंगामी सरकारची सत्ता मान्य केली. पेट्रोग्राड सोव्हिएटच्या पाठिंब्याशिवाय हंगामी सरकार टिकणेच अशक्य होते आणि ही गोष्ट हंगामी सरकारच्या प्रमुखाप्रमाणे सोव्हिएटच्या सूत्रधारांनाही माहीत होती.

अशा रीतीने १५ मार्च रोजी रशियातील झारशाहीचा अंत झाला आणि १६ मार्चपासून नवे हंगामी सरकार राज्यकारभार पाहू लागले. गेल्या चार दिवसांत केरेन्स्कीने एवढी तडफ दाखविली होती की, सारा देश त्याला डोक्यावर घेऊन नाचत होता. ड्युमामधील जहाल आणि मवाळ या दोन्ही गटांना एकत्र राखण्याची जबाबदारी पार पाडण्याचे सामर्थ्य एकटया केरेन्स्कीलाच प्राप्त झाले होते. त्यामुळे साऱ्या देशभर झंझावाती दौरा करून त्याने नव्या सरकारला पाठिंबा देण्याचे जनतेला आवाहन केले. सारा देश एकजुटीने नव्या राजवटीच्या पाठीशी उभा राहिल्याशिवाय हाती आलेले स्वातंत्र्य टिकणार नाही, हे त्याच्या आवाहनाचे मुख्य सूत्र होते.

ओडेसा येथील सैनिकांपुढे बोलताना तो म्हणाला, 'देशातील प्रत्येक नागरिक नव्या राजवटीकडे मोठया अपेक्षेने पाहत आहे. कारण शतका-शतकामधून अशी

क्रांती क्वचितच होत असते. आपण एक फार मोठे ऐतिहासिक कार्य पार पाडले आहे. रशियन जनतेची गुलामगिरीतून सुटका करून नव्या राजवटीने तिला स्वातंत्र्याच्या खुल्या वातावरणात आणले आहे. गेली कित्येक वर्षे आपण जुलमी झारशाहीविरुद्ध लढा देत होतो. आपला त्याग वाया गेला नाही. आता यापुढे आपणा सर्वांचा एकच प्रयत्न असला पाहिजे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे आपले घोषवाक्य झाले पाहिजे. या घोषवाक्यातूनच क्रांती अवतरली आहे हे विसरता कामा नये. ही प्रतिज्ञा पूर्ण व्हावी यासाठी अनेक पिढ्यांनी आपले रक्त सांडले. हुतात्म्यांच्या रक्तसिंचनातून जन्माला आलेल्या स्वातंत्र्याच्या उद्यानाचे आपण मालक नाही ही जाणीव सतत जागी असली पाहिजे. ज्या प्रमाणे एखादा माळी जागरूक राहून आपल्या उद्यानाचे रक्षण करतो तसेच या नवजात स्वातंत्र्याचे रक्षण करण्याचे कार्य आपल्याल पूर्ण करावयाचे आहे.

**रशियात क्रांती झाली तेव्हा सर्व प्रमुख बोल्शेव्हिक नेते रशियाबाहेरच होते. लेनिन, झिनोव्हेह, सेमाइको, लुनाखरस्की, लिटविकॉव्ह, गॅनेटस्की यांपैकी कोणी लंडनला, कोणी पॅरिसला, तर कोणी झुरिक-जिनीव्हाला राहत होते. बुखारिन आणि ट्रॉटस्की न्यूयॉर्कला होते तर स्टॅलिन, कामेनेव्ह आणि स्वेर्डलोव्ह सैबेरियात हद्दपारीची शिक्षा भोगीत होते. १७ मार्चच्या सकाळी ब्रोन्स्की धावत धावतच लेनिनकडे येऊन सांगू लागला. ' कॉमरेड, रशियात क्रांती होऊन झारशाही नष्ट झाली आहे. '**

**' छे, काही तरी काय सांगतोस? एवढ्यात क्रांती कशी होईल?' लेनिन म्हणाला.**

**ब्रोन्स्कीने लेनिनपुढे झुरिकमधील ताजे वर्तमानपत्र ठेवले तेव्हा कोठे रशियात क्रांती झाल्याच्या बातमीवर त्याचा विश्वास बसला.**

**लेनिन म्हणाला, ' आता आपल्याला शक्य तितक्या लवकर पेट्रोग्राडमध्ये जायला हवे. या क्रांतीने हुरळून न जाता आपल्याला आपले उद्दिष्ट पूर्ण करायला हवे. अनायासे एवढी चांगली संधी निर्माण झालेली असताना आपल्याला स्वस्थ बसून चालणार नाही. '**

रशियात क्रांती झाल्याची बातमी कळताच युरोप–अमेरिकेमधले आणि सैबरियासारख्या दूरच्या भागात फेकले गेलेले बोल्शेव्हिक कार्यकर्ते पेट्रोग्राडकडे जाण्यासाठी निघाले. जो तो मिळेल ते वाहन पकडून पेट्रोग्राडमध्ये लवकर पोचण्याची धडपड करू लागला. दहाएक दिवसांत स्टॅलिन पेट्रोग्राडमध्ये येऊन दाखल झाला. तो येण्यापूर्वीच ' प्रावदा ' पत्राचे प्रकाशन पुन्हा सुरू झाले होते. मोलोटोव्ह आणि शिकआपनिकोव्ह हे ' प्रावदा 'चे हंगामी संपादक नव्या राजवटीवर कडाडून हल्ला चढवीत होते. २९ मार्चला स्टॅलिन, कामेनेव्ह आणि मुदानोव्ह या त्रिमूर्तींनी ' प्रावदा 'ची संपादकीय सूत्रे आपल्याकडे घेतली व नव्या राजवटीशी बोल्शेव्हिकांनी समझोता केला पाहिजे, असे प्रतिपादन करण्यास त्यांनी प्रारंभ केला. बोल्शेव्हिक आणि

डावे मेन्शेव्हिक यांनी एकत्र येऊन, रशिया युद्धात विजयी व्हावा यासाठी नव्या राजवटीला साथ दिली पाहिजे हे स्टॅलिनच्या विचाराचे सूत्र होते. जर्मनीचा पराभव करणे हे आपले पहिले उद्दिष्ट असले पाहिजे असे स्टॅलिन 'प्रावादा'तून सांगू लागला. रशियाने युद्धातून बाहेर पडावे हा विचार त्याला मुळीच मान्य नव्हता. परंतु लेनिन आणि ट्रॉटस्की यांची भूमिका मात्र सर्वस्वी वेगळी होती.

२० मार्च रोजी लेनिनने झुरिकहून पत्र लिहिले– 'इंग्लंड आणि फ्रान्स या साम्राज्यवादी राष्ट्रांनी, 'मिलिउकोव्ह, गुचकोव्ह आणि मंडळी'ला हाताशी धरून झारशाही उखडून लावली आहे. जर्मनविरुद्धच्या युद्धात रशियन कामकऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी आपल्या बाजूने रक्त सांडावे या हेतूनेच अँग्लो–फ्रेंचांनी ही क्रांती घडवून आणली आहे.'

याच दिवशी न्यूयॉर्कहून प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या 'नोव्हा मीर' या पत्रात ट्रॉटस्कीने लिहिले– 'रशियात झारची सत्ता आता राहिलेली नाही असे गुचकोव्ह आणि मिलिउकोव्ह मोठ्या रुबाबात लोकांना सांगत आहेत. परंतु ते अँग्लो–फ्रेंचांचे हस्तक आहेत. इंग्लंड आणि फ्रान्स या साम्राज्यवादी राष्ट्रांनी चालविलेल्या युद्धात रशियानेही यापुढे मोठ्या उत्साहाने भाग घ्यावा यासाठी मिलिउकोव्ह, गुचकोव्ह यांचे हंगामी सरकार तार स्वरात क्रांतीचा महिमा गात आहे.'

लेनिन झुरिकला राहत होता तर ट्रॉटस्की न्यूयॉर्कमध्ये. गेल्या दहा वर्षांत त्या दोघांची साधी भेटही झाली नव्हती. तरीही त्या दोघांची विचारधारा परस्परांशी किती जुळणारी होती हे क्रांतिसंबंधीच्या त्या दोघांच्या प्रतिक्रियेवरून सहज ध्यानात येते.

२४ मार्चला लेनिनने दुसरे पत्र लिहिले– 'रशियातील कामगारांनी साडेसात लाखांची सेना उभारून जमीनदार आणि भांडवदार यांचे हस्तक असलेल्य गुचकोव्ह व मिलिउकोव्ह यांची सत्ता नष्ट केली पाहिजे. रशियाने मित्रराष्ट्रांबरोबरचे आपले करार आता रद्द ठरविले पाहिजेत. प्रत्येक देशातील कामगारांनी आपापल्या देशातील भांडवलशाही सरकारे नष्ट करून त्या जागी श्रमिक जनतेच्या राजवटीचा पुकारा केला पाहिजे. रशियन कामगारवर्गाने या कार्यात आघाडीवर असावयास हवे.'

रशियन राज्यक्रांतीच्या निमित्ताने लेनिन जागतिक कामगारक्रांतीचा आदेश देत होता. रशियातील झारशाही जाऊन त्या ऐवजी लोकप्रतिनिधींच्या हाती सत्ता आली याबद्दल त्याने मुळीच आनंद प्रदर्शित केला नाही. कामगारसत्ता प्रस्थापित होईपर्यंत स्वस्थ बसावयाचे नाही असा त्याचा निर्धार होता. म्हणूनच या नव्या राजवटीवर तो झारशाहीपेक्षाही अधिक कडवट हल्ले चढवू लागला. बोल्शेव्हिक पक्षच काय तो कामगार क्रांती घडवून आणील या अदम्य विश्वासाने तो नव्या राजवटीवर तडाखे हाणत होता.

२५ मार्चला त्याने आणखी एक पत्र लिहिले– 'गुचकोव्ह आणि मिलिउकोव्ह यांचे सरकार इंग्लंड व फ्रान्स या साम्राज्यवाद्यांचे हस्तक असून त्यांच्या लूटमारीत आपणही सहभागी व्हावे असा नव्या रशियन राजवटीचा प्रयत्न चालू आहे.'

लेनिनने ही पत्रे स्टॉकहोम येथे राहत असलेल्या गॅनेटस्कीकडे पाठवून दिली होती. गॅनेटस्कीने ती पेट्रोग्राडमधल्या लेनिनच्या बहिणीकडे–मारिआकडे – रवाना केली. नंतर ही पत्रे एप्रिलमध्ये 'प्रावदा'त प्रसिद्ध करण्यात आली.

लेनिन अद्यापही झुरिकलाच होता. तो आपल्याविरुद्ध प्रखर प्रचार करीत आहे हे माहीत असूनही हंगामी सरकारने त्याच्या आगमनावर कोणतीही नियंत्रणे घातली नव्हती. परंतु त्याला रशियामध्ये जाऊ देण्यास इंग्लंड आणि फ्रान्स यांचा मात्र विरोध होता. लेनिन आणि ट्रॉटस्की रशियात पोचताच रशियाने युद्धातून बाहेर पडावे असाच प्रचार ते करतील याची अँग्लो-फ्रेंच नेत्यांना पूर्ण कल्पना होती. म्हणूनच ट्रॉटस्की न्यूयॉर्कहून हॅलिफॅक्स येथे येऊन पोचताच ब्रिटिश सरकारने त्याला पुढचा प्रवास करण्यास मनाई केली. परराष्ट्रमंत्री मिलिउकोव्ह याने ब्रिटिश सरकारला तार करून ट्रॉटस्कीच्या सुटकेची मागणी केली तेव्हाच ट्रॉटस्की पेट्रोग्राडला येऊन पोचला.

स्टॅलिन आणि ट्रॉटस्की पेट्रोग्राडमध्ये येऊन दाखल झाल्याचे कळल्यानंतर आता आपण स्वित्झर्लंडमध्ये वेळ गमावणे इष्ट ठरणार नाही हे लेनिनने ओळखले. रशियातील हंगामी सरकार स्थिर होण्यापूर्वीच आपण त्याच्यावर हल्ला चढवून रशियामध्ये बोल्शेव्हिक पक्षाची सत्ता प्रस्थापित करायला हवी या विचाराने बेचैन झालेला लेनिन पेट्रोग्राडला परतण्याची धडपड करू लागला. अँग्लो-फ्रेंचांबरोबर युद्धात भागीदारी करण्याऐवजी रशियाने जर्मनीशी शांतता करार करून स्वतःच्या विकासाचा स्वतंत्र मार्ग चोखाळावा असे त्याचे मत होते. आपले हे मत जर्मन सरकारला कळले तर स्वतःच्या हितासाठी तरी जर्मन सरकार आपल्यास रशियात पोचविण्याचा प्रयत्न करील हे ओळखून लेनिनने त्या दृष्टीने पावले टाकण्यास प्रारंभ केला.

एप्रिलच्या प्रारंभी लेनिन जर्मनीच्या मदतीने रशियात परतण्याच्या खटपटीला लागला.

(क्रमशः)



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ माकडांचे प्रेम–प्रकरण

मी हिंदी सिनेमा बघत नाही. आमची ही बघते—अन् मी तिला सोबत करतो. घाण्याला जुंपलेला बैल आणि हिंदी सिनेमा बघत खुर्चीवर डांबलेला मी यांत अधिक दमनीय परिस्थिती कोणाची आहे, हे सुज्ञांस सांगणे नलगे. पण सक्तीने पाहावे लागणारे हिंदी चित्रपट बघून बघून एक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे, व ती म्हणजे प्रेम कसे करावे याचे इतके तपशीलवार शिक्षण दुसरीकडे मिळणे कठीण. पहिली गोष्ट म्हणजे फिल्मी प्रेम गद्यात बोलून व्यक्त करता येत नाही. ते गाऊन दाखवावे लागते. बरे, गाणे म्हणजे बैठकीवर आरामात बसून हातात तंबोरा घेऊन म्हणतात ते नाही महाराजा, हे गाणे टेकड्यांवरून धावाधाव करीत म्हणावे लागते. दुसरे म्हणजे प्रेम करताना नायिकेला टिपटॉप राहावे लागते. म्हणजे हिंदी सिनेमातले प्रेम करणारी नायिका श्रीमंत घरातली दाखवली असेल तर तिला जीन्स घातल्याशिवाय प्रेम करणे अशक्य आहे, अन् चुकून ती गरीब दाखवलेली असली तरी किमान जॉर्जेटची साडी नेसणे तिला कम्पल्सरी असते. आणि नायक ? त्याला तर प्रेम करण्यासाठी अक्षरशः चिंपांझीसारख्या उड्या माराव्या लागतात.

– चिंपांझीवरून आठवण झाली. दिल्लीच्या झूमध्ये रवी आणि रिटा नावाचे चिंपांझी जोडपे आहे, त्यांचे म्हणे एकमेकांशी पटत नाही, म्हणून त्यांना ' नांदा सौख्यभरे 'चा धडा शिकविण्यासाठी सुखी वैवाहिक चिंपांझी-जीवनाचा एक चित्रपट दाखविण्यात येणार आहे. आता बोला ? सिनेमा पाहून हल्लीची मुली-मुले प्रेम करायला शिकतात हे माहीत होते; पण चिंपांझींनाही प्रेम कसे करावे हे शिकविण्यासाठी सिनेमा दाखविण्याची पाळी येईल, याची कुणाला कल्पना होती ? पण रवीला सिनेमातल्या चिंपांझी नायिकेचा थिल्लरपणा, तिचे स्लॅक घालणे, गावात नळ असताना सखींच्या बरोबर नदी-किनारी घागर घेऊन नाचणे-गाणे इत्यादी गोष्टी आवडल्या नाहीत तर ? मुख्य म्हणजे चिंपांझी-नायकाप्रमाणे उड्या मारीत मारीत प्रेम करणे त्याला मुळीच पसंत नसले तर ? उलट रिटानेही चिंपांझी-नायकाच्या माकडचेष्टांना आपले चपटे नाक मुरडले तर ? असे काही झाले तर सिनेमाचा परिणाम या चिंपांझी-दांपत्याने झू-डायरेक्टरसमोर घटस्फोट घेण्यात व्हायचा. त्यापेक्षा दोघांनाही " हाऊ टु बी हॅपी दो मॅरीड " हे गाजलेले पुस्तक वाचायला दिले तर ?

## ☐ अन्यायाधीश

मागे एकदा हिंदुस्थानातील काही न्यायाधीशांनी महागाई वाढली आहे, तेव्हा आमचा पगार वाढवावा अशी मागणी केली. तेव्हा 'न्यायालयातील गमती-जमती–' चाच हा एक किस्सा आहे असे मला वाटले होते. पण नाही. हिंदुस्थानातल्या दीडशे रुपये कमावणाऱ्या कारकुनाइतकी अमेरिकेतल्या दीड हजार रुपये कमावणाऱ्या कारकुनाला महागाई जाचत नसेल कदाचित्, पण गरीब बिचाऱ्या न्यायाधीशांच्या बाबतीत तरी जगभर एकच बिकट परिस्थिती दिसते. आता हेच बघा, यूनोचे सर-चिटणीस उ थांट यांनी नुकतीच अशी सूचना केली आहे की हल्ली महागाई वाढली असल्याने हेग येथील आंतरराष्ट्रीय कोर्टाच्या न्यायाधीशांचा पगार वाढवावा. हा पगार सध्या किती आहे ? वर्षाला फक्त दोन लाख रुपये ! पाहिलेत ? वर्षाला दोन लाख रुपयांत म्हणजे महिन्याला सुमारे सतरा हजार रुपयांत न्यायाधीशांना भागवायला सांगणे हा न्याय झाला का ? गंभीर आंतरराष्ट्रीय खटल्यांचे निवाडे देणारा न्यायाधीश कसा वजनदार म्हणजेच जाडजूड हवा. पण दोन लाख रुपयांत त्याला अंगावर मूठभर मांस चढण्याइतके तरी जेवायला मिळत असेल का ? स्वत: सतरा हजार नवे पैसे कमावणाऱ्या काही कद्रू कारकुनांच्या मते न्यायाधीशांचा आहे हाच पगार जास्त आहे. त्याच्या मते न्याय हा स्वस्त असला पाहिजे. अशी जगभर हाकाटी आहे–पण म्हणून न्यायाधीश स्वस्त असले पाहिजेत, असे कोणी सांगितले ?

## ☐ फ्री–स्टाईल कुस्तीचे परराष्ट्र–धोरण

"ब्रिटिश रेल्वेला काय झाले आहे" या विषयावर लंडन विश्वविद्यालयाने नुकताच एक शिक्षण वर्ग चालविला व तो वैद्यक-विद्यालयात ठेवला. म्हणजे ब्रिटिश रेल्वेला कशाची गरज आहे हे न शिकताच कळण्याजोगे आहे. आपल्याकडे ही स्थळ माहात्म्याची कल्पना पुष्कळच ठिकाणी वापरता येईल. उदाहरणार्थ, भारताचे चीनशी संबंध या विषयावर एखादा परिसंवाद आखाड्यात ठेवावा आणि एखाद्या पहिल-वानाला अध्यक्ष म्हणून बोलवावे. 'आपली समाजवादी समाजरचना' या विषयावरचे व्याख्यान कुठल्याही महाराजाच्या कुठल्याही राजवाड्यात ठेवावे, आणि 'बिहारची उपासमार' या विषयावरच्या चर्चेला तर एकच ठिकाण योग्य आहे–अशोक हॉटेलचा बॅन्क्वेट हॉल.





# पुरंदरच्या बुरुजावरून

इंग्रज हिंदुस्थानात आले व्यापार करण्यासाठी. इथली बाजारपेठ काबीज करावी ही त्यांची इच्छा. पण अखेर त्यांनी सारा हिंदुस्थानच जिंकला. ह्या चिमूटभर लोकांनी सहा हजार मैलांवरून इथं येऊन एवढा हा अफाट लोकसंख्येचा आणि अफाट लांबीरुंदीचा देश जिंकला तरी कसा ? अशी कोणती जादू त्यांच्यापाशी होती ? अशी कोणती असामान्य शस्त्रास्त्रं त्यांच्यापाशी होती ? ह्या चिमूटभर गोऱ्या लोकांना अहिमहीसारखं काही वरदान मिळालेलं होतं का ?

पण हे प्रश्न त्या काळी आमच्या लोकांच्या मनात कधीच डोकावत नव्हते. क्वचित कोणाच्या मनात डोकावलेच तर ' हे कलियुग आहे ! कलियुगात हे जलचर म्लेंच्छच अवनीतलावर राज्य करणार ! ! ' असं स्वत:चेच स्वत:ला उत्तर देऊन तो गप्प बसे.

एकदा ' एका ' मनात असेच आश्चर्याचे प्रश्न उगवले. म्हणजे त्याचं असं झालं, शेवटच्या बाजीराव पेशव्यांची कारकीर्द होती. त्या वेळी मुंबईला माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन नावाचा एक अत्यंत हुशार आणि अत्यंत महत्त्वाकांक्षी इंग्रज साहेब खुर्चीवर होता. हा साहेब अजगरासारखा होता. वरून शांत. धीमा. पण संधी साधताच कडकडून विळखा घालणारा आणि गिळून टाकणारा ! एल्फिन्स्टन जबर मुत्सद्दी होता. तो अभ्यासकही तसाच मोठा होता. शत्रूच्या बारीक सारीक गोष्टींचेही त्याला अचूक ज्ञान होते. त्यामुळं तो शत्रूची नाडी अचूक ओळखीत असे. त्याची स्वत:ची ग्रंथशाळा मोठी होती. आमची मराठी माणसं

एल्फिन्स्टनला म्हणत असत 'आळूफिष्टण.' हाच आळूफिष्टण पुढं पुण्याला बेटात इंग्रजांचा रेसिडेण्ट म्हणून आला. पेशवाईचा शेवटचा घास याच साहेबाने घेतला.



तर सांगायची गोष्ट अशी की, एकदा श्रीमंत बाजीराव पेशव्यांचा राजकीय वकील मुंबईस साहेब टोपीकरांशी काही बोलणी करण्याकरिता गेला. मराठ्यांचा राजदूत पालखीत बसून मुंबईत फोर्टात पोहोचला. वकिलाबरोबर चार हत्यारबंद मराठे स्वारही होते.

साहेबाची आणि मराठी हेजिबाची धूळभेट झाली. नंतर अनेक मुलाखती झाल्या. एके दिवशी साहेबबहादूर आमच्या वकिलाला म्हणाले की, आपण जरा समुद्राकिनारी रेतीवर फिरायला जाऊ! साहेबाला फिरायला जायची लहर आली. मराठी वकिलानेही होकार दिला. साहेब व वकील मुंबईच्या सागरी रेतीवर फिरायला उतरले. वकिलाबरोबरचे ते मराठी शिलेदार आणि साहेबाचे हत्यारबंद शिपाई दूर उभे राहिले. फक्त वकील व साहेब मऊ मऊ रेतीच्या रुजाम्यावरून पावलं टाकीत बोलत बोलत निघाले. ती वेळ सागरी भरतीची होती. सागराच्या लाटा रोरावत किनाऱ्याकडे एका मागोमाग एक झेपावत होत्या. फेस उसळत होता.

# इंग्रज आणि मराठे

ब. मो. पुरंदरे

प्रत्येक लाटे सरशी किनाऱ्यावर सागर चढाई करून भूमी जिंकीत होता: मोठं छान दिसत होतं ते चित्र.

बोलता बोलता मराठी वकील साहेबाला म्हणाला,

" तुम्ही लोक इतके थोडे. किती दुरून इथं आमच्या देशावर येता. इथली भाषा, इथली हवा, इथली माणसं, इथला सारा मुलूख तुम्हांला परका. अनोळखी. तरीही तुम्ही आमच्याच घरात येऊन आमचाच पराभव करता ! आम्ही परातभर असून तुम्ही चिमूटभर लोक आम्हांला जिंकता तरी कसे ? तुमच्यात काय जास्त आहे ? आमच्यात काय कमी आहे ?"

साहेब किंचित् हसला. पण बोलला काहीच नाही. मराठी वकिलानं पुन्हा विचारलं,

" धन, धान्य, हत्यारं, कोट, किल्ले, सैन्य, दारूगोळा, बुद्धिबळ कमी आहे आमच्यापाशी ? "

" नाही ! " साहेब संथपणे म्हणाला.

" मग आम्ही कमी कशात आहोत ? "

साहेबाने वकिलाला काहीच जबाब दिला नाही. त्याने खूण करून, आपल्या एका इंग्रज शिपायाला हाक मारली. दूर उभा असलेला सशस्त्र इंग्रज शिपाई ताबडतोब पळत पळत आला. त्याने साहेबाला सॅल्यूट केला. साहेबाने त्याला रेतीवर समुद्राकडे तोंड करून उभे राहण्याचा हुकूम दिला. तो शिपाई त्या जागी ताठ पुतळ्यासारखा उभा राहिला. साहेब नंतर वकिलास म्हणाला,

" तुमच्या मराठा शिपायास बोलवा आणि इथं आमच्या शिपाया-शेजारी उभे करा ! "

वकिलाने दूरवर उभ्या असलेल्या आपल्या मराठी शिलेदारास खुणेने बोलावले. शिलेदार आला. वकिलाने त्याला इंग्रजाच्या शेजारी उभे राहण्यास सांगितले. इकडे तिकडे पाहत मराठा सैनिक उभा राहिला. वेळ भरतीची होती. लाटा त्या दोघा शिपायांच्या पावलांवर चढल्या. मराठा शिपाई लगेच दोन पावलं मागं सरकला.. दुसरी लाट आली. मराठा गडी आणखी दोन पावलं मागे हटला ! इंग्रज मात्र जागच्या जागी ताठ उभा होता. प्रत्येक लाटेसरशी मराठा मागे मागे सरकत होता. इंग्रजाच्या गुडघ्याच्या वर पाणी चढलं, तरीही तो ताठ खांबासारखा उभा होता. आमचा मराठा गडी मात्र घरी जायच्या मार्गावर होता.

आणि मग साहेबाने मराठी वकिलाकडे मान वळवून पाहिले. वकिलाने खाली मान वळवली. वकिलाच्या पायांखालची वाळू निसटत होती. ●

नवे साहित्य

ऐतिहासिक कथासंग्रह

# पुरंदऱ्यांची दौलत

बाबासाहेब पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २.

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H–649

# काश्मिर ते कन्याकुमारी

★ क्षणाक्षणाने कणाकणाने हातातून चाललेला काश्मिर

★ जाण्याच्या पवित्र्यात उभा असलेला केरळ

★ १२ रुपये किलो साखर

★ नथुला खिंडीत आणि सिक्कीमच्या सीमेवरच नाही तर खुद्द दिल्लीतही मुजोरी करणारा मस्तवाल माओ

★ 'कॉन्व्हेंट' शाळांत जाऊन इंग्रजाळत चाललेली नवी उगवती पिढी

★ परदेशाकडे डोळे लावून बसलेला बुद्धिजीवी वर्ग

★ परान्नावर जगणारा भारत

## ही सात शल्ये मनी

ही शल्ये प्रत्येक भारतीयाच्या मनीमानसी खुपत असताना दिवाळी आनंदात कशी जाणार !

'माणूस'ला तरी असला उसना आनंद आणि खोटा आशावाद मंजूर नाही.

म्हणूनच

## 'माणूस' दिवाळी अंक

यंदा

## समस्याप्रधान अंक

म्हणून प्रसिद्ध होत आहे.

सविस्तर निवेदन पुढील अंकी.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर